

# श्री साईलीला

ट

कि. ५० पैसे

१९६८

## या अंकांत—

१. ह. भ. प. सोनोपंत दांडेकर.
२. साईबाबा फाउंडेशन कशासाठीं ?
३. संत नामदेव व योगिनी मीरा.
४. सद्गुरूच्या शोधार्थ.
५. थोर संतांचा प्रसाद.
६. भक्तांचे अनुभव.
७. नामसाधनेचें महत्त्व.
८. कल्याणकारी कथा.
९. संतश्रेष्ठाची पंढरी.
१०. श्रीसाईनाथ अष्टपदी.



# श्री साई वाक्सुधा

आमच्यांत उतावळेपणा भरून राहिला आहे इतरांचेंही नुकसान करतों. सबुरीनें घ्यायला काय आपण शिकलें पाहिजे. फार महत्त्वाचा गुण आहे हा. आयुष्यांत कधीं ना कधीं लहानमोठीं संकटें येतात. त्यावेळीं निराश होऊन कसं बरं चालेल? धीर धरून वागल्यानें कांहीं तोटा होत झाला तर फायदाच होईल. संकटप्रसंगीं आपलें रक्षण करणारा जर कोण असेल ती म्हणजे सबुरी !

—श्रीसाईसच्चरित


## श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] ऑगष्ट १९६८ [ अंक ५ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४२२६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# ह. भ. प. सोनोपंत दांडेकर

प्रिय वाचक –

ह. भ. प. शंकर वामन तथा सोनोपंत दांडेकर यांच्या निधनानें वारकरी पंथच नव्हे तर अखिल महाराष्ट्र एका थोर सत्पुरुषाला मुकला आहे. हजारों नव्हे तर लक्षावधी लोकांना त्यांनीं आपल्या कथाकीर्तनाच्या, प्रवचनांच्या नि लेखांच्याद्वारें भक्तिमार्गाला लाविलें आहे. त्यांच्याठायीं आजच्या काळांत दुर्मिळ होऊन राहिलेल्या अनेक सद्गुणांचें सुंदर संमेलन झालेलें होतें. भक्तिभावानें ओथंबलेलीं त्यांचीं रसाळ कीर्तनें व प्रवचनें यापुढें ऐकायला मिळणार नाहींत, हा दुःखद विचार मनांत आला म्हणजे होणारें वियोगदुःख शब्दांनीं प्रगट करतां येण्यासारखें नाहीं.

मामासाहेब या घरगुती नांवानें ते सर्वत्र ओळखले जात असत. त्यांचा जन्म १८९६ सालीं ठाणें जिल्ह्यांतील केळवें माहिम गावीं झाला. बालपणींच त्यांना मातेचा वियोग घडला. शाळेंत ते एक हुषार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. त्याचप्रमाणें देवभक्तीचा जणूं काय वारसाच ते बरोबर घेऊन आले होते. घरीं भागवतधर्माचे संस्कार सतत घडत होतेच. त्यांचें महाविद्यालयीन शिक्षण पुण्यांत झालें. एम्. ए. झाल्यानंतर न्यू पुना कॉलेजमध्यें प्राध्यापक या नात्यानें ते दाखल झाले. गुरुदेव रामभाऊ रानडे यांच्या नेतृत्वाखालीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याची सुसंधी त्यांना लाभली हें त्यांचें केवढें भाग्य ! रामनारायण रुईया कॉलेजचे व्हाईस प्रिन्सिपाल व शेवटीं स. प. महाविद्यालयाचे प्राचार्यपदीं विराजमान होऊन ते १९५१ सालीं सेवानिवृत्त झाले. आचार्य असले किंवा प्राचार्य झाले तरी देहू, आळंदी व पंढरपूर येथील वाऱ्या वारकऱ्यांबरोबर नित्यनेमानें करण्यास ते कधींही विसरले नाहींत. त्यांचा भक्तिभावच तसाच दांडगा व जातिवंत होता.

मामासाहेब खरोखर मोठे भाग्यवान् समजले पाहिजेत. आणि तसें तरी कां समजायचें ? त्यांना देवाधर्माची बरोबर ओळख झालेली होती. मग देवाधि-

देव त्यांच्यावर प्रसन्न कां होणार नाहीं? त्यांनीं जो मार्ग लहान वयापासून स्वीकारला, त्याला पोषक नि मार्गदर्शक होणाऱ्या घटनाच त्यांच्या आयुष्यांत लागोपाठ घडत गेल्या.

२०

विष्णुबुवा जोग यांचा सहवास त्यांना समजूं लागल्यापासून लाभला होता. त्यामुळें त्यांचें सारें जीवन प्रकाशमान् झालें होतें. मार्गांत कुठेंही म्हणून काळोख राहिला नाहीं. विष्णुबुवा जोग यांचें सद्गुरु या नात्यानें त्यांना मार्गदर्शन लाभलें. त्यांचीही ज्ञानेश्वरीचे भाष्यकार, कीर्तनकार व प्रवचनकार या नात्यानें कीर्ति सर्वत्र फैलावली होती. तोच कित्ता पुढें जन्मभर मामासाहेबांनीं गिरविला.

आचार्य व प्राचार्य या नात्यानें असंख्य विद्यार्थ्यांशीं, अधिकाऱ्यांशीं व सहकारी प्राध्यापकांशीं त्यांचा संबंध आला आणि तो यावयाचाच. त्यांत त्यांचा निरंहकारी, नम्र व मिळतें घेणारा स्वभाव दिसून आला. भक्तिभावाकडे, देव-धर्माकडे आत्यंतिक ओढा; परंतु आपल्या वाट्यास जें कर्तव्य व ज्या जबाबदाऱ्या आल्या त्यांत हेळसांड किंवा कसूर त्यांच्याकडून कधींही घडली नाहीं. कर्तव्य-पालन हाही ईशसेवेचा एक आवश्यक भाग आहे असें त्यांनीं मानिलें.

व्यवहारांत वावरत असतां किंवा अनेकांच्या संबंधांत हरघडीं यावें लागत असतां, आपलें वर्तन शुद्ध कसें ठेवावें, वागणूक परोपकारी व परहितदक्ष कशी असावी आणि त्याचबरोबर वक्तशीरपणा, शिस्त यांचें काटेकोरपणें पालन कसें करावें, यांचे धडे त्यांच्यापासून घेण्यासारखे होते.

आपल्या वागणुकीमुळें व शिकविण्याच्या पद्धतीमुळें विद्यार्थिवर्गांत ते अत्यंत प्रिय झाले होते. ते सेवानिवृत्त झाले तेव्हां विद्यार्थ्यांनीं स्वयंस्फूर्तीनें पसतीस हजार रुपयांचा निधि जमा करून तो गुरुदक्षिणा म्हणून त्यांना अर्पण केला. तो त्यांनीं लोककल्याणाचें कार्य करणाऱ्या निरनिराळया संस्थांना वाटून टाकिला.

ते शिक्षणकार्यांतून निवृत्त झाले तरी त्यानंतरच्या सुमारें अठरा वर्षांच्या काळांत लोकशिक्षणाचें अफाट कार्य त्यांनीं हिरीरीनें पार पाडिलें. याचें कारण आपल्या शिरावरील जबाबदारीची व कर्तव्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. ती त्यांना स्वस्थ बसूं देत नसे. कीर्तन, प्रवचन नि लेखन हीं प्रचाराचीं तिन्हीं साधनें त्यांनीं आचरणांत आणिलीं आणि हजारो लोकांना बोधामृत पाजून त्यांच्या जीवनांत आनंदाचा नि समाधानाचा ओलावा निर्माण केला.

ज्ञानेश्वरांची कितीही कठीण ओवी असो किंवा तुकोबांचा कोणताही अभंग असो; त्याचें निरूपण करीत असतां मनास पटणारे व हृदयांत स्थिर होऊन रहाणारे दाखले देऊन श्रोत्यांना ते मंत्रमुग्ध करून सोडीत असत. अशा प्रकारचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अमृततुल्य वाणींत होतें.

आधुनिक काळांतील अशा या थोर संताचा अंत्यविधि एकंदरींत त्यांच्या थोरवीस साजेशा स्वरूपांत पार पाडला गेला हें योग्यच झालें. मामासाहेब ज्ञानेशांचे व त्यांच्या ज्ञानेश्वरीचे एकनिष्ठ भक्त. मग पुण्यांत त्यानीं देह ठेविला असला तरी त्या देहाचा अंत्यविधि पुण्यक्षेत्र आळंदी येथें संस्मरणीय रीतीनें उरकण्यांत आला. पुणें ते आळंदी अंतर सुमारें तेरा मैल आहे. त्या पुण्यपुरुषाची अंत्ययात्रा बुधवार ता. १० रोजीं सकाळीं ७ वा. निघून सायंकाळीं पांच वाजतां आळंदीस पोहोंचली. त्या अंत्ययात्रेचा तो सोहळा अवर्णनीय असाच होता. मार्गावर नामसंकीर्तन, पुष्पहारसमर्पण व विठ्ठलगजर चालू होता.

मामासाहेब दांडेकर यांच्या वैकुंठवासानें जनतेंत जी पोकळी निर्माण झाली आहे ती योग्यप्रकारें भरून निघणें कठीण आहे. माणसानें या जगांत येऊन आपलें जीवन लोकशिक्षणार्थ नि परोपकारार्थ कसें वेचावें, याचा अत्यंत उच्च आदर्श त्यांनीं आमच्यापुढें ठेविला आहे. तो आदर्श आचरणांत आणण्यासाठीं मनोभावें झटणें हेंच आपलें कर्तव्य आहे. त्या कर्तव्याची जाणीव तुम्हांआम्हांला सदैव राहो हीच श्रीसाईचरणीं प्रार्थना.

— संपादक

# साईबाबा फाउंडेशन कशासाठीं ?

## कार्यक्रमासंबंधीं विशेष स्पष्टीकरण

श्रीसाईबाबांच्या नांवानें एक फाउंडेशन स्थापन झालें आहे. त्याची घटना तयार करून ती संस्था रजिस्टरही करण्यांत आली आहे. हें सर्व पद्धतशीर झालें. परंतु फाउंडेशन कशासाठीं ? बाबांचा आणि अशा फाउंडेशनचा परस्पर संबंध तरी काय ? हे प्रश्न सहाजिक उद्भवतात.

श्रीसाईबाबांची पन्नासावी सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी जवळ येत आहे. त्यावेळीं नेहमींप्रमाणें भजन पूजन, प्रवचनादि कार्यक्रम होतीलच. परंतु त्याशिवाय बाबांचें शिरडी येथें जें जीवनकार्य पार पडलें व जें केवळ जनतेच्या कल्याणासाठीं होतें तें त्यांचें कार्य पुढेंही सतत चालू राहिलें पाहिजे. त्यांचें कायमचें स्मारक ह्या दृष्टीनें करण्यांत आलें पाहिजे. आणि त्याच सद्धेतूनें साईबाबा फाउंडेशन स्थापन करण्यांत येत आहे.

साईबाबांनीं आपलें जीवन गरीबीनें व कोणत्याही प्रकारें गाजावाज न करतां केवळ इतरेजनांच्या कल्याणार्थ घालविलें. अगदीं बाजूच्या एका खेड्यांत वास्तव्य करून आपल्या कार्याचा गाजावाजा होऊं न देतां लोककल्याणाच्या दृष्टीनें त्यांनीं नाना चमत्कार केले व ते केवळ जनता भक्तिमार्गाकडे वळावी या हेतूनें.

श्रीसाईबाबा यांच्यासंबंधीं विशेष लक्षांत घेण्याजोगी गोष्ट म्हणजे ते सर्व धर्मांकडे समदृष्टीनें पहात असत. त्यांनीं कोणत्याही धर्माच्या बाबतींत भेदभाव मानला नाहीं. सर्वधर्मसमानत्व हें त्यांचें एक जीवनतत्त्व होतें. त्यांचे भक्त वेगवेगळ्या धर्मांत होते. ते आपआपल्या धर्मरिवाजांप्रमाणें त्यांची पूजाअर्चा किंवा आराधना करीत असत व त्या त्या धर्मीयांच्या समाधानासाठीं ते त्यांचे उपचार करून घेत असत, परंतु त्यांना कोणत्याही उपचारांची मुळींच जरूरी नव्हती. त्यांचा खराखुरा धर्म म्हणजे साधें निर्मळ जीवन व जे जे कोणी सहाय्यार्थ आपल्याकडे येतील त्यांना जरूर तें सहाय्य करून त्यांना दुःखमुक्त करणें हाच

त्यांचा मानव धर्म होता. त्यांना सर्वसाधारणपणें सर्व धर्मांचें व धर्मग्रंथांचें ज्ञान होतें. हिंदुशास्त्रांतील महत्त्वाच्या तत्त्वांचें ज्ञान त्यांच्या बोलण्यावरून कधीं कधीं स्पष्ट होत असे व त्या धर्मशास्त्रांत पारंगत अशांनाही त्यांचें तें ज्ञान पाहून आश्चर्याचा धक्का बसत असे. अमुक धर्म श्रेष्ठ आहे तेव्हां तुम्ही त्या धर्माचा स्वीकार करा अशी शिकवण त्यांनी कधींही कोणाला दिली नाहीं. प्रत्येकानें आप-आपल्या धर्मतत्त्वाप्रमाणें वागावें, त्यांतच त्याचा तरणोपाय आहे असें त्यांचे सांगणें असे.

श्रीसाईबाबा हे हिंदु होते, मुस्लीम होते कीं दुसरे कोणी होते याबद्दल अजूनही चर्चा केली जाते. परंतु ती निष्फळ आहे. पारशी धर्मीयांच्या अग्निमंदिरांत रात्रंदिवस धुनी पेटत असते तशी धुनी त्यांच्या वास्तव्यस्थानीं सतत पेटत असे, आणि आजही तो उपक्रम अखंड चालू आहे. ते हिंदुधर्मीयांना प्रिय असलेले सणवार पाळण्यास लावीत असत. रामनवमी, गुरुपौर्णिमा यासारखे पवित्र दिवस मोठ्या समारोहानें पालन केले जात असत. तेव्हां ते कोणत्याही एका धर्माचे अनुयायी किंवा अभिमानी नव्हते. ते सर्वधर्मीयांचे होते व सर्व धर्मांवर त्यांची सारखी श्रद्धा होती. त्यांचें लक्ष आधिभौतिकतेपेक्षां आध्यात्मिकतेकडे फार होतें. लोकांना दुःखनिवारणार्थ जें जें हवें तें तें त्यांनी मुक्तहस्तें दिलें. दुःखपीडितांचें दुःख त्यांनीं आपल्याठायीं असलेल्या दैवी सामर्थ्याच्या बळावर दूर केलें. त्याच्या बुडाशीं एकच हेतू होता. लोकांनीं संकटमुक्त व्हावें आणि आपलें लक्ष भगवंताच्या पायांकडे वळवावें.

वाघासारखें होतें त्यांचें. एकदां का कोणीही इसम त्यांच्या त्या पकडींत आला म्हणजे त्यांच्या त्या पकडींतून तो कधींही सुटत नसे. त्यांचे भक्त नाहींत कुठें? भारतांत आहेत तसेच भारताबाहेरही अनेक आहेत. जे जे कोणी आपापल्या अनुभवासाठीं त्यांच्याकडे आले किंवा दुःखनिवारणासाठीं ज्यांना ज्यांना त्यांच्या सन्निध जावें असें वाटलें ते नंतरही त्यांनाच चिकटून राहिले. कारण साईबाबा ही आपली मायमाउली आहे, तीच आपलें रक्षण करणारी आहे, अशी त्यांची भावना झाली व पुढेंही आध्यात्मिक उन्नतीसाठीं व सत्याच्या शोधासाठीं ते त्यांच्यापासून दूर होऊं शकले नाहींत.

अशाप्रकारची होती त्यांची सर्वभूतहितेरत वृत्ति आणि तो त्यांचा उदात्त हेतू कांहीं प्रमाणांत तरी साध्य व्हावा व तशा रीतीनें त्यांचें स्मारक करावें या

हेतूनें त्यांच्या नावें फाउंडेशन संस्था स्थापन करण्यांत येत आहे. शिक्षणाला ते फार महत्त्व देत असत. त्या शिक्षणाशीं मात्र अध्यात्माची जोड असावी. योग्य शिक्षणाशिवाय माणसाची उन्नति होणें कठीण आणि म्हणून त्या हेतूनें शिक्षणप्रसारास अग्रस्थान देण्यांत आलें आहे. त्यांच्याकडे नानाप्रकारच्या व्याधींनीं पिडलेले लोक मोठ्या आशेनें नेहमीं येत असत. आपली सारी शक्ति खर्च करून ते आलेल्यांचें दुःख निवारण करीत असत. माणसांना शारीरिक दुःखामुळें भारी त्रास भोगावा लागतो. तो यथाशक्ति दूर करतां यावा या हेतूनें वैद्यकीय उपायांची, औषधपाण्याची सोय करणें हा फाउंडेशनचा दुसरा उद्देश आहे. याबाबतींत विशेषतः आध्यात्मिक, यौगिक व अशाच प्रकारच्या मार्गाचा प्रामुख्यानें उपयोग करण्यांत येईल.

असें सांगतात कीं, आरंभकाळीं साईबाबा रोगपीडितांना कांहीं औषधोप-चार करीत असत. विशेषतः आयुर्वेदिक, युनानी किंवा वनस्पतींच्या सहाय्यानें रोगग्रस्तांचे रोग दूर करीत असत. या उपायांना स्थान आहेच; परंतु त्याशिवाय इंग्रजी औषधांकडेही दुर्लक्ष करावयाचें नाहीं. आज त्याही औषधपद्धतीला महत्त्व असून तिचाही उपयोग करावयाचा.

जनतेंतील दैन्य व दारिद्र्य दूर करण्यासाठीं झटणें हेंही एक ध्येय या फाउंडेशनपुढें आहे. लोक बाबांकडे शारीरिक, मानसिक, त्याचप्रमाणें आर्थिक स्वरूपाचीं नाना दुःखें घेऊन जात असत व आपापल्या दुःखांचा परिहार करून घेऊन जात असत. हें सर्वांना माहीत आहे. सर्वांचीं म्हणजे आपल्याकडे येणारीं माणसें कोणत्याही जातीचीं, धर्मांचीं वा समजुतीचीं असोत, त्यांचा दुःखपरिहार शक्य त्या मार्गांनीं करणें हें बाबांचें नेहमींचें धोरण होतें.

साईबाबासंबंधीं विशेष माहिती जाणून घेण्याची ज्यांना इच्छा आहे त्यांना साईचरित्रांत ती कथन केलेली आढळून येईल. त्यांच्या पायांशीं रोज हजारों रुपये येऊन पडत असत. त्यांना त्या संपदेशीं काय करावयाचें होतें ? आलेले सारे पैसे ते दिवसभर गोरगरीबांस व गरजवंतांस वाटून स्वतः मोकळे होत असत. सायंकाळीं पुन्हां आपले फकीर ते फकीर ! अंगावरच्या एका कफनीशिवाय त्यांच्या-जवळ माझें म्हणायला दुसरें कांहीं नसे ! अशारीतीनें त्यांना जगाला हेंच दाख-वायचें होतें कीं, पैसा हें कांहीं आपलें सर्वस्व नव्हे. पैसा हें ध्येय नव्हे. मग

त्याला चिकटून कां रहायचें ? पैसा येईल तसा जाईल. या जगांत श्रीमंतांचे गरीब झालेले व गरीबांचें श्रीमंत झालेले आपण प्रत्यहीं पहात नाहीं का? होय; पैशांना मोल आहे. केव्हां ? त्याचा विनियोग जेव्हां गरजवंतांसाठीं केला जातो, दुःखितांचें दुःख निवारण करण्यासाठीं केला जातो तेव्हां. जनतेच्या कल्याणासाठीं पैशांचा विनियोग व्हावा. अशा रीतीनें जो पैसा खर्च केला जातो त्याचा फायदा दुहेरी असतो. जो खर्च करतो त्याला व ज्याला तो मिळतो त्यालाही. शिरडी येथें याची साक्ष आपणांस पहायला मिळते. साईबाबांचें वास्तव्य त्या गावांत झालें; त्यामुळें त्या गांवाचा कसा कायापालट होत आहे हें आपण प्रत्यक्ष पहात आहोंत. गोरगरिबांस भिक्षा घालून भिकारीवर्ग वाढविण्याचा हेतू या फाउंडेशनच्या चालकांनीं आपल्यापुढें ठेवलेला नाहीं; तर त्यांना दारिद्र्य नि भिक्षावृत्ति यांचें उच्चाटन करायचें आहे. त्या दृष्टीनें योग्य तीं पावलें टाकण्याचा चालकांचा विचार आहे.

धर्मादाय आदर्शवत् असावा. तो कसा असावा ? लोकांनीं भिक्षां देहि करण्यासाठीं दारोदार न हिंडतां त्यांनीं स्वतःच्या पायांवर उभें रहाण्यास व उद्योगानें स्वतःचें पोट भरण्यास शिकावें. प्रत्येक स्त्री-पुरुषांस, दुसऱ्यापुढें हात न पसरतां स्वतःच्या पायांवर उभें राहून मानानें जगतां आलें पाहिजे. धर्मादाय अशा प्रकारचा असावा आणि ही संस्था त्या प्रकारच्या मार्गाचें अवलंबन करणार आहे.

या जगांत आपण असे लोक पहातों कीं कांहींना काहीं कारणामुळें त्यांनीं योजलेले बेत फसले जातात आणि मग पदरीं निराशा पडते. कित्येकांजवळ प्रबळ इच्छा असूनही साधनसामुग्रीचा अभाव असतो आणि त्यामुळें त्यांना सुखी व समाधानी जीवन जगतां येत नाहीं. दारिद्र्याचें भूत त्यांच्या मानगुटीवर बसलेलें असतें. तें भूत दूर करून माणसांचें जीवन निष्कंटक करणें हें आहे या फाउंडेशनचें ध्येय. अशा लोकांना फाउंडेशनकडून शक्य तें सहाय्य दिलें जाईल व हेलकावे खाणारी त्यांची जीवननौका स्थिर केली जाईल. पुन्हां अशा रीतीनें आधार सांपडून वर आलेले लोक इतर अभागी लोकांस मदतीचा हात पुढें करून त्यांना भाग्यवंत बनवतील. साईबाबा फाउंडेशनचा अशारीतीनें हाही एक मूलभूत उद्देश आहे

कीं, जनतेला स्वतःच्या पायांवर उभी करणें, तिच्याठायीं स्वावलंबनानें जगण्याचें सामर्थ्य निर्माण करणें तसेंच त्यांना जरूरीच्या व योग्यवेळीं थोडीफार मदत करून त्यांना स्वतंत्रपणें उपजीविका करण्याचा मार्ग मोकळा करून देऊन राष्ट्रोपयोगी नागरिक बनविणें हा आहे. केवळ गोरगरिबांस किंवा गरजवंतांस दान करणें हाच केवळ नाहीं. साईबाबांनीं कित्येकांस सढळ हातांनीं सहाय्य केलें. त्यांनीं त्या सहाय्याचा उपयोग किंवा दुरुपयोग जसा केला तदनुसार ते या जगांत तरले किंवा नामशेष झाले. सहाय्य घेणाऱ्यांनीं हें सहाय्य केवळ मी तरावें यासाठीं नाहीं तर माझ्याकडून इतरेजनांच्या उद्धारास हातभार लागावा ही बाबांची अंतिम इच्छा आहे हें ज्यांनीं ओळखलें त्यांची जीवनांत भरभराट होत गेली. बाबांचा हा हेतू ओळखणें हें महत्त्वाचें आहे. बाबांकडून सहाय्य मिळविण्याची ही फार नामी संधी आहे. तिचा आपण फायदा करून घेऊंया आणि स्वतःचा तळीराम गार करून घेऊंया, अशा स्वार्थी धोरणानें जे कोणी वागले त्यांच्यावर संकटपरंपरा कोसळल्याचें सांगतात. असा होता बाबांचा न्याय ! त्याची जाणीव प्रत्येकानें ठेविली पाहिजे.

याशिवाय अनेकांगी व सर्वांना स्पर्श करून समाजकल्याण नि देशकल्याण साधण्यास सहाय्य करणारा असा सर्वसाधारण स्वरूपाचा व तसाच महत्त्वाचा एक उद्देश या फाउंडेशनपुढें आहे. तो कोणता ? अनेकांगी म्हणून सांगितलें. तो कसा ? खेड्यांचा शक्य त्या मार्गांनीं उद्धार करणें, शेतीसुधारण्याकडे लक्ष पुरविणें, समाजकार्यें नाना प्रकारचीं आहेत. तीं पार पाडण्यासाठीं नमुनेदार कार्यकर्ते तयार करणें, जे पंगू व निराधार असतील त्यांच्यासाठीं आश्रयस्थानें स्थापन करणें, ज्यांना नोकरीची जरूरी असेल त्यांना त्या कार्यांत शक्य तें सहाय्य करणें, वगैरे.

अशा प्रकारचें सर्वव्यापी लोककल्याणकारी आणि जनतेच्या उद्धारास कारणीभूत होणारें फाउंडेशन स्थापन करण्याची कल्पना ज्यांच्या डोक्यांत आली त्यांची अशी दृढ श्रद्धा आहे कीं आजकाल बाबा शिरडी येथें आत्मरूपानें वावरत आहेतच परंतु जर कां ते शरीरानेंही वावरत असते तरीही त्यांनीं अशाच धोरणानें लोकोद्धाराचें आपलें कार्य चालविलें असतें. तेव्हां शेवटीं सांगायचें एवढेंच कीं, या साईबाबा फाउंडेशनच्या रूपानें बाबांचें कायमचें व सतत लोको-

द्वाराचें कार्य करीत रहाणारें एक साधन निर्माण करण्यांत आलें आहे. याचा पाया मजबूत घालण्यांत आला आहे. साईबाबांच्याच धोरणानें या संस्थेचें कार्य चालणार असल्यामुळें त्यांचे आशीर्वाद या फाउंडेशनला मिळाल्याशिवाय रहाणार नाहींत.

या फाउंडेशनला जे विश्वस्त लाभले आहेत ते जबाबदार, बाबांच्या कार्याची यथोचित जाणीव असणारे व त्यांचें कार्य सद्भावनापूर्वक पुढें रेटण्यासाठीं मनोभावें झटणारे आहेत.

## विश्वस्त-मंडळ

१ श्री. एस. के वानखेडे—महाराष्ट्र राज्याचे फडणीस व कायदे कानूचे मंत्री
२ श्री. पी. के. सावंत—महाराष्ट्र राज्याचे शेतकीखात्याचे मंत्री.
श्री . एस. बी. चव्हाण—महाराष्ट्र राज्याचे पाटबंधारे व वीज खात्याचे मंत्री
४ श्री. व्ही. एस. पागे—महाराष्ट्र ले. कौन्सिलचे अध्यक्ष.
५ श्री. टी. एस. भारदे— महाराष्ट्र राज्य विधि-मंडळाचे अध्यक्ष.
६ न्या. मू. जे. आर. मुधोळकर, दिल्ली·
७ श्री. पी. जे. चिमुळगुंद—सेक्रेटरी गृहखातें— महाराष्ट्र राज्य.
८ श्री. जी. बी. नेवाळकर.
९ श्री. एन. डी. साहुकार.
१० श्री. बी. आर ढेकणे, प्राचार्य सिडनहॅम कॉलेज.
११ श्री. डी. डी. पाटणकर, रिसीव्हर श्री साईबाबा संस्थान-शिरडी

# संत नामदेव व योगिनी मीरा

[ पूर्वार्ध ] २०५

लेखकः— **गणेश विष्णु कविटकर,** एम्. ए.

हिंदी साहित्यांत भक्तिभावनेचा प्रवाह सर्वप्रथम नामदेवांच्या काव्यांत दिसतो. ते स्वतः विशाल प्रतिभेचे कवि, प्रचारक आणि प्रेमळ भक्त होते. ते निर्गुण व अद्वैती भक्त होते. ही त्यांची विविध स्वरूपें त्यांच्या काव्यांत दिसून येतात. उत्तरभारतांत नामदेवांना निर्गुण भक्तिसांप्रदायाचे प्रथम प्रचारक आणि हिंदी गीत-रचनेचे प्रथम गायकहि मानले जाते. त्यांच्या पश्चात् कबीरदास, रविदास, नानकदेव, दादुदयाळ, रज्जबजी, वषनाजी, सुंदरदास, मीराबाई यांनीं आपल्या काव्यरचनेंत नामदेवांचा आदरानें उल्लेख केलेला असून या सर्व संतांच्या जीवनावर आणि साहित्यावर नामदेवांचा प्रभाव पडलेला दिसतो. नामदेवांच्या वाङ्मयकृतींनीं या संतांना जी स्फूर्ती दिली, तसा परिणाम अन्य कुठल्याहि हिंदी संतकवीनें घडवून आणलेला नाहीं. नामदेवांचें साहित्य हें नवीन दृष्टि देणारे आहे. त्यांच्या वाणींतून एक नवीन विचारधारा निर्माण झाली आणि तिनें कबीरादि संतांता नवीन प्रेरणा दिली. या नवविचार धारेला हिंदी साहित्यांत निर्गुण संप्रदाय अथवा संतमत असें म्हणतात. योगिनी मीराबाई या संतमताच्या अनुगामिनी होत्या. त्यांच्या रचनेवर नामदेवसाहित्याच्या झालेल्या परिणामांचा विचार प्रस्तुत लेखांत संक्षेपानें करावयाचा आहे.

नामदेवांचा काल इ. स. १२७० ते १३५० ई. यांतला असून संत मीराबाईचा काल इ. स. १४९५ ते १५६० हा आहे. ती इ.स. १५६० मध्यें कृष्णमूर्तींत विलीन झाल्याचे समजण्यात येते. तिचा जन्म राजस्थानांतील मेडता परगण्यांतील कुडकी गांवीं जोधपूरच्या राठोड वंशांतील रत्नसिंहाच्या घराण्यांत झाला. तिला बालपणापासून श्रीकृष्णभक्तीचें जणुं वेडच होतें, तर नामदेवांचा जन्म महाराष्ट्रांत पंढरपूर येथील एका शिंपी कुळांत झाला होता. विठ्ठलनामाचा छंद त्यांनीं बालपणींच घेतला होता व टाळ दिंडी घेऊन देवाच्या द्वारीं नाचण्यांत त्यांना विलक्षण सुख वाटूं लागले होतें. वयाबरोबर त्यांची भक्तीहि वाढत गेली.

विठ्ठल प्रेम दुथडी वाहूं लागलें. गुरूपदेशानंतर नामदेव सगुणभक्तीकडून निर्गुणोपासनेकडे वळले आणि त्यांनी भारतभर संचार करून भागवतधर्माचा प्रचार केला. गुजराथ, राजस्थान, पंजाब, मध्यप्रदेश इत्यादि उत्तरभारताचा भूभाग अक्षरशः त्यांनीं कीर्तनसुखामृतानें भिजवून टाकला. तत्परिणामीं शिखांच्या धर्मग्रंथांत नामदेवांच्या साहित्यरचनेस सन्मानाचें स्थान मिळालें व नामदेवांच्या जीवन-कथा उत्तरभारतांतील कवींच्या काव्यांत आढळूं लागल्या. अशाच प्रकारचा एक पुढील कथाभाग मिराबाईच्या रचनेंत आढळतो.

एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास नामदेवांच्या घरास आग लागली आणि बऱ्याचशा वस्तू जळून खाक झाल्या. नामदेव पंचतत्त्वादि सर्व वस्तू भगवत् स्वरूपांत पाहत असत. "हे परमेश्वरा ! यांचाहि अंगीकार करा" असें म्हणून ज्या कांहीं वस्तू राहिल्या होत्या त्या अग्निज्वालेस त्यांनीं अर्पण केल्या. नामदेवांचा हा अलौकिक भाव पाहून देव प्रसन्न झाले; आणि त्यांनीं त्यांचें राहतें घर रातोरात शाकारून दिलें [ पहा नामादासाच्या भक्तमालेवरील प्रियादासाची टीका ] या प्रसंगाचा भावपूर्ण उल्लेख मीराबाईच्या काव्यांत आढळतो.

**म्हाँरे नैणा आगे रहां जो जी, स्याम गोविंद ॥ टेक ॥**
**दास कबीर घर बालद जो लाया, नामदेव की छान छबंद ।**
**दासधना को खेत निपजायो; गज की टेर सुनंद ।**
**सब संतोंका काज सुधारा मीराँ सूँ दूर रहंद ।**

मिराबाई की पदावली पृ० ४८

[ हे श्यामवर्ण गोविंदा, माझ्या डोळ्यासमोर तुम्ही रहा. आपण कबीरांच्या घरीं बैल आणला, नामदेवांचे छप्पर शाकारून दिलें, धन्नादासाच्या शेतांत बीं पेरलेंत आणि गजेंद्राचा धावा ऐकून त्याच्या साहाय्यार्थ धावून गेलांत; सर्व संतांचीं कामें केलींत परंतु मीराबाईपासून तुम्ही दूर राहातां ]

### आत्मनिवेदनपर भावकाव्य

नामदेव आणि मीराबाई यांचें काव्य आत्मनिवेदनपर असलें तरी तें प्रासंगिक व सहजस्फूर्त आहे. सगुणोपासनेस अनुकूल मनोवृत्ति आणि भजनावरील उत्कट भाव विशेषत्वानें त्यांच्या रचनेंत आढळतो. नामदेवांचें पंढरीच्या पांडुरंगावर जेवढें प्रेम तेवढेंच उत्कट प्रेम मीराबाईचें आपल्या 'प्रियतम'

श्री. गिरीधर लाला' वर होतें. हातीं टाळवीणा घेऊन नामदेव विठ्ठलासमोर जसे आवेशमय भजन करीत होते, त्याचप्रकारें मीरा 'ज्यूँ ज्यूँ वाहि' रिझ-विण्यास प्रवृत्त होत होती. साधक म्हणून मीरेचें दर्शन कांहीं पदांतून घडते तर कांहींत मीरा संतसमागमांत दंग झालेली दिसते. तिच्या कांहीं भजनांतून संतमतप्रणालीहि आढळते. भक्तिभावनेंतील अनेक सूक्ष्म छटा व तरल आंतरिक जीवन नामदेवाप्रमाणें मीराबाईच्या रचनेंत साकल्यानें प्रतिबिंबित झालें आहे. मीराबाईच्या साकारोपासनेंत नामदेवाप्रमाणें आत्मसमर्पणाची ओढ आहे. 'लवण समुद्रा जागा मागे। तेहि समुद्र झाले अंगे॥' अशी तन्मयता नामदेवांच्या वृत्तींत आहे, तर एका श्रीकृष्णाशिवाय मीरेला दुसरें कोणीहि नको होतें. 'मेरे तो गिरिधर गोपाल दुसरो न कोई' हीच तिची धारणा होती. श्रीकृष्ण-मंदिरांत ती प्रियकराच्या प्रेमाचे घुंगरु पायांत बांधून तन्मयतेनें नृत्यगान करी. (प्रेमप्रीत की बाँधि घुंगरु) तिनें आपल्या रचनेंत श्रीकृष्णाला, त्या सगुणरूप भगवंताला कितीतरी नांवानें आळविलें आहे. कुंजविहारी, गिरिधर–नागर, गोपाळ, गोविंद, नंदकिशोर, नंदलाल, प्रभु, मनमोहन, श्याम, सांवलिया, स्वामी, हरि इत्यादि आणि या श्रीकृष्णचंद्राचे रूप, सौंदर्य, गुण व लीला यांचें प्रशं-सागान करण्यांत तिला मोठें आकर्षण वाटे. त्याच्याशिवाय एक क्षणहि जगणें तिला अशक्य होतें. मीराबाई म्हणतात कीं, 'गिरिधर नागर' हा तिचा पूर्व-जन्मींचा साथी. तो नुसताच प्रियकर नसून साक्षात् पतिरूप आहे. 'भाई म्हांने सुपनें में वरी गोपाला'। (स्वप्नांत मला हरीनें वरिलें). ध्यानीं, मनीं, स्वप्नीं ती हरीला पतीच्या ठिकाणीं पाही. हरीशिवाय अन्य कुणाला वरण्याची कल्पनाच तिला सहन होत नसे आणि म्हणून ती त्याला 'पिव', 'सांजण', वा 'सैंया' या शब्दांनीं आवाहन करी. मीराबाईच्या या प्रगाढ रागानुराग कृष्णभक्तीचें दर्शन तिच्या पदापदांत होतें.

## गुरु रविदास

नामदेवांच्या प्रभावळींतील रामानंदाचे शिष्य आणि कबीरांचे समकालीन संत रैदास (रविदास) यांच्या मीराबाई या शिष्या. रविदासांचा काल संवत् १४४५ ते सं. १५७५ मानला जातो. त्यांनीं हिन्दी संत–काव्याच्या परंपरेचे प्रवर्तक म्हणून नामदेवांचा नतमस्तक होऊन गौरव केलेला आहे. रैदास लिहितात:

नामदेव कबीरु तिलोचन सधना सैनु तरे ।
कहि रविदासु सुनहु रे संतसु हरिजीत ते सभै सरे ॥

(आदि श्री गुरु ग्रंथ साहब जी, पृष्ठ ५९८, भगत रविदास जी, रागु आसा
मीराबाईच्या कित्येक पदांत संतवचनाच्या प्रभावाचें वर्णन केलेलें आढळतें. तिनें म्हटलें आहे कीं,

**सतगुरु मिलिया सुंज पिछनी, ऐसा ब्रह्म मैं पाती ।**
**सगुरा सूरा अमृत पीवे, निगुरा प्यासा जाती ॥ १६७**

या सद्गुरूच्या कृपेनें आत्मोपलब्धि झाली, त्या 'प्रियतमा' ची भेट झाली असें मीराबाईनी अनेकदां म्हटलें आहे.

(१) गुरु मिलिया रैदासजी दीन्ही ग्यानकी गुटकी (पद २४)
(रैदासजी गुरु प्राप्त झाले आणि त्यांनीं ज्ञानगुटिका दिली)
(२) मीराँनें गोविंद गुरु मिलिया रैदास (प. २९)
(मीराला गुरु रैदासांच्या रूपानें गोविंद प्राप्त झाले)

**(३) रैदास सन्त मिल मोहि सद्गुरु दीन्ही सुरत सहदानी**
**मैं मिली जाय पाय पिय अपना, तब मोरी पीर बुझानी ॥ १५७ ॥**

संत रैदास मला गुरु मिळाले आणि त्यांनीं ब्रह्मानंद प्राप्ति करून दिली, मी माझ्या प्रियतमाकडे गेलें आणि मला माझ्या प्रियकराची भेट झाली. तेव्हां माझें दुःख नाहींसें झालें.

**(४) गुरु रैदास मिले मोहि पूरे**
गुरु रैदास मला पूर्ण गुरु लाभले

**अद्वैती भूमिका**

आपल्या प्रियतमाला उद्देशून मीराबाईनें अनेक पदांत 'निर्गुण' 'निरंजन' 'अविनाशी' 'अंतरजामी' 'राम' 'रमैय्या' ही संबोधनें उपयोजिलीं आहेत. त्यावरून ती अपरिच्छिन्न ब्रह्मरूप झाल्याचें स्पष्ट होतें. या ठिकाणीं मीराबाईच्या 'सब घट दीसै आतमा' या सर्वत्र स्वरूप दर्शन घडविणाऱ्या काव्यपंक्ती व नामदेवांच्या 'सब गोविंद है । सब गोविंद है । सब गोविंद बिना नहीं कोई ॥' या वचनाची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. याशिवाय मीराबाईनीं आपल्या कांही पदांत तो 'प्रियकर' 'गिरिधर

नागर ' वस्तूतः सगुण नाहीं, निर्गुणहि नाहीं, परंतु तो या सगुणनिर्गुणापलीकडील अनिर्वचनीय वस्तु आहे असें म्हटलें आहे. भक्तिमार्गांतील मीराबाईची ही भूमिका नामदेवाप्रमाणेंच ' सगुणाचे नि आधारें निर्गुण पाविजे निर्धारें—' अशी अद्वैती स्वरूपाची होती.

## रचनेंतील विचारसाम्य

नामदेवांची परम वैराग्य भावना आणि रैदासांची व मीराबाईंची सहज वैराग्यभावना यांत मोठें साम्य आहे. ईश्वरतादात्म्याचें वर्णन करतांना नामदेवांनीं म्हटलें होतें:—

**तुम बिन घरि येक रहूं नहिं न्यारा ।**
**सुनु यह केशव नियम हमारा ॥**
**जहाँ तुम त्रिरीवर ताहां हम मोरा ।**
**जहाँ तुम चंदा तहाँ मैं चकोरा ॥ १ ॥**
**जहाँ तुम तरुवर तहाँ मैं पंछी ।**
**जहाँ तुम सरोवर तहाँ मैं मच्छी ॥ २ ॥**
**जहाँ तुम दिवा तहां मैं बत्ती ।**
**जहाँ तुम पंथी तहां मैं साथी ॥ ३ ॥**
**जहाँ तुम शिव तहां मैं बेलपूजा ।**
**नामदेव कहे भाव नहीं दूजा ॥**

**( स. ना. प. १९१ )**

( हे केशवा ! माझा नियम ऐक, तो असा कीं, तुझ्याशिवाय एक घडीदेखील मी राहाणार नाहीं. जेथें तूं पर्वतराज आहेस तेथें मी मोर आहें. जेथें तूं चंद्र आहेस तेथें मी चकोर आहें. जेथें तूं वृक्षवर आहेस तेथें मी पक्षी आहें. जेथें तूं सरोवर आहेस तेथें मी मासा आहें. जेथें तूं दिवा आहेस तेथें मी वात आहें. जेथें तूं प्रवासी आहेस तेथें मी तुझा साथी आहें. नामदेव म्हणतात, ज्याप्रमाणें बेलाची पानें आणि शंकरपूजा ही वेगळी नाहींत त्याप्रमाणें माझ्यांत आणि त्या परमात्म्यांत दुजाभाव राहिलेला नाहीं. )

( पुढील अंकीं समाप्त )

ग्रंथ–परिचय—

# सद्‍गुरूंच्या शोधार्थ

आम्हां हिंदुधर्मीयांची अनादिकाळापासून पूर्वपरंपराच अशी आहे कीं, जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या अवस्थेंत आपणास सद्गुरूचा लाभ घडावा व जीवनसाफल्याचा मार्ग मोकळा व्हावा, अशी तीव्र आकांक्षा मनांत जागृत झालेली असते. बहुजनसमाजास 'सद्गुरूवांचूनी सांपडेना सोय' असें वाटत असतें. गुरूवर संपूर्ण निष्ठा ठेवून त्यानें दिलेला मंत्र आत्मसात् केला असतां आपल्या कल्याणाचा मार्ग सांपडत असतो, ही सार्वत्रिक भावना; परंतु सद्गुरूचा लाभ सर्वांच्याच वाट्याला येत असतो असें मात्र नाहीं. 'गुरू पहातां लक्ष कोट्यानुकोटी।' आजकाल आपल्या सभोंवर गुरूंचें पीक अमाप आल्याचें आढळून येईल. सद्गुरूची भेट होणें ही एक पूर्वपुण्याईची घटना म्हणतां येईल. जीवनाचा प्रवास चालू असतां मार्गावर कधीं तरी सद्गुरूची भेट घडावी असें प्रत्येकाला वाटत असतें. योगायोगानें एकाद्याच्या प्रवासांत ती भेट होतेही. ज्याला ती होते त्याचा जीवनांतील मार्ग धोपट होतो; मग तो कल्याणमार्गानें आपला प्रवास सुरू करतो, परंतु गुरूच्या शोधांत असतां आपणास कसकशा अडचणी आल्या, कधींमधीं आपली फसगत कशी झाली व सद्गुरूचें दर्शन घडल्यानंतर आपलें जीवन कसें उजाळून निघालें, हें सांगण्याच्या व्यापांत सहसा कोणीं पडत नाहीं. आपला मार्ग धोपट झाला ना ? मग त्यांत इतरेजनांस सांगण्यासारखें काय आहे ? ही प्रत्येकाची भावना.

प्रस्तुत पुस्तकाचे विद्वान् नि त्यागी लेखक—श्री. केशव कृष्ण प्रधान ॲडव्होकेट, हे त्या वर्गांतील नाहींत. ते अध्यात्ममार्गी व 'मागच्यास ठेंच पुढचा शहाणा' या न्यायानें वागूं इच्छिणारे आहेत. जे बरेवाईट अनुभव आले ते स्वतःशींच ठेऊन काय करायचें ? ते जसे आले तसे त्या मार्गांत असणाऱ्यापुढें खुल्या दिलानें ठेवावे. ते त्यांना मार्गदर्शक होतील. त्यामुळें अपाय कोणाला होणार नाहीं. झाला तर फायदाच होईल ही त्यांची भावना असावी.

श्री. केशवराव प्रधान यांचा साईलीलेच्या वाचकांस वेगळा परिचय करून देण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं. गेल्या अनेक वर्षांपासून केवळ

भक्तिभावामुळें व साईबाबावरील निष्ठेमुळें साईलीलेंत त्यानीं लेखन केलेलें आहे व पुढेंही करीत रहातील. ते साधक, मुमुक्षू त्याचप्रमाणें एक अधिकारी पुरुष आहेत. ‘सद्गुरूच्या शोधार्थ’ या छोट्या ग्रंथांतील त्यांचे कांहीं लेख साईलीलेंतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत नवीन नि आवश्यक ती भर घालून त्यांनीं या पुस्तकाची पूर्तता केली आहे. आणि ते सारे अकराही लेख किंवा प्रकरणें प्रत्येक साधकानें व सद्गुरूचा शोध लावूं इच्छिणाऱ्यांनीं मननपूर्वक वाचण्यासारखे आहेत.

या पुस्तकाची रचना थोडक्यांत अशी आहे:— पहिल्या पांच लेखांत श्री. प्रधान यांनीं सद्गुरूची छाननी कशी करावी व ती करतांना कोणती दृष्टि ठेवावी याबद्दल उपयुक्त माहिती दिली आहे; ती निश्चितपणें प्रत्येकास मार्गदर्शक होऊन रहाण्यासारखी आहे. त्यानंतर सहाव्या लेखांत सद्गुरूच्या प्रत्यक्ष भेटीचा सुखसोहळा अत्यंत मधुर नि हृदयस्पर्शी भाषेंत वर्णन करण्यांत आलेला आहे. आणि सातव्यापासून अकराव्या पर्यंत, एकंदर पांच प्रकरणांत पूर्वपुण्याईनें सद्गुरूचें सान्निध्य लाभल्यामुळें आपलें एकंदर जीवन कसें उजाळून निघालें, मानसिक नि बौद्धिक जीवनांत कसकशी क्रांति घडून आली किंवा येऊं शकते, याची स्वानुभवपूर्ण माहिती करून देण्यांत आली आहे.

श्री. रा. बा. कोतवाल या अधिकारी व्यक्तीनें या पुस्तकास जी सुंदर प्रस्तावना लिहिली आहे, त्यांत ते म्हणतात, “महापुरुषाच्या प्रत्यक्ष भेटीपासून मुमुक्षु साक्षात्काराचा मार्ग कसा चोखाळूं लागतो याचें दिग्दर्शन श्री. प्रधान यानीं सद्गुरूनें मुमुक्षूला केलेल्या उपदेशाद्वारें दिग्दर्शित केलें आहे.”

“या पुस्तकाची एकंदर रचना अशी आहे कीं, परमार्थासाठीं तळमळणाऱ्या मुमुक्षूपासून ते साक्षात्कारसंपन्न साधकापर्यंत होणारी परिणति या पुस्तकांत फारच योग्य तऱ्हेनें व सोप्या शब्दांत विशद केलेली आहे; त्यामुळें हें पुस्तक निव्वळ सद्गुरुशोधावर नसून, सद्गुरूपासून मिळणाऱ्या साक्षात्कारापर्यंत, सर्व स्थित्यंतरें दर्शविणारें असें उपयुक्त पुस्तक आहे.”

श्री. कोतवाल यांनीं या पुस्तकाचा थोडक्यांत करून दिलेला परिचय यथायोग्य आहे असें आम्हांला वाटतें. त्यापेक्षां श्री. प्रधान यांच्या पुस्तकाचा अधिक तो परिचय आम्हीं काय करून देणार ?

नाशिक येथील सुप्रसिद्ध साक्षात्कारी महापुरुष श्री. गजानन महाराज (जन्म–शके १८१४; समाधि शके १८६८) यांच्या सान्निध्यांत कर्मधर्म-संयोगानें श्री. प्रधान हे १९३६ सालीं आले. त्यामुळें त्यांना ज्याचा ध्यास लागला होता, तें त्यांना गवसलें. त्यांचें सारें जीवन उजाळून निघालें. त्यांच्या सान्निध्यांत जो कांहीं उपदेशामृताचा लाभ झाला त्याचाही परिचय श्री. प्रधान यांनीं शेवटीं करून दिलेला आहे.

या महापुरुषानें शेवटीं संदेश कोणता दिला ? ते म्हणतात:– “व्यवहार आणि परमार्थ यांचे अगदीं दोन भाग करणारे जे लोक असतात त्यांना व्यवहार व परमार्थ दोन्हीं समजत नाहींत. व्यवहार आणि परमार्थ हे संलग्न आहेत व म्हणूनच व्यवहारी माणसानें निदान आपला व्यवहार तरी बरोबर व्हावा म्हणून परमार्थाची कास धरणें आवश्यक आहे. मन–बुद्धीमार्गें जाऊन परमार्थ स्वरूपाचा अनुभव घेतलेली एकादी श्रेष्ठ विभूति जर सुदैवानें अशा व्यवहारी माणसास भेटली तर त्याला ईश्वरी अस्तित्वाची प्रचीति हृदयांत होण्यास वेळ लागणार नाहीं. हीच प्रचीति पुढें इतकी वाढते कीं त्यामुळें ईश्वरी अस्तित्वावर त्याची निस्सीम श्रद्धा बसते व परमेश्वर आपले रोजचे व्यवहार चालवितो हा अनुभव त्याला प्रतिक्षणीं येऊं लागतो. त्यामुळें व्यवहारांतील अडचणी दूर होऊन, चिंता व काळजी वगैरे मनाच्या स्थितीचा त्याला विसर पडूं लागतो व शेवटीं त्याला व्यवहार व परमार्थ दोन्ही सुखावहच होतात. सर्वसाधारण बहुजनसमूहाला हाच संदेश तूं सतत देत रहा म्हणजे तूंही कृतार्थ होऊन मलाही मी धन्य झालों असें वाटेल.”

एवढ्यावरून या पुस्तकाची आमच्या वाचकांस जरूर ती कल्पना होईल अशी आशा आहे.

## सद्गुरूच्या शोधार्थ—

लेखक:–केशव कृष्ण प्रधान, प्रकाशक:– रा. बा. कोतवाल, गणेशप्रासाद, मुंबई ७ पृष्ठें ८६. किंमत–दोन रुपये.

# थोर संताचा प्रसाद

—विनोबाजी

बीज भाजुनि केली लाही । आम्हां जन्म–मरण नाहीं ॥ १ ॥
आकारासी कैंचा ठाव । देह प्रत्यक्ष झाला देव ॥ २ ॥
साखरेचा नव्हे ऊंस । आम्हां कैंचा गर्भवास ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघा जोग । सर्वां घटीं पांडुरंग ॥ ४ ॥

जोंधळा भाजून एकदां त्याची लाही बनविली म्हणजे मग पुन्हा त्या लाहीचा जोंधळा बनूं शकत नाहीं. त्याप्रमाणें तुकाराम महाराज म्हणतात, आम्ही मृत्यूंतून अमृतांत दाखल झाल्यामुळें आतां पुन्हा मृत्यूच्या ताब्यांत जाणार नाहीं. आतां आम्ही जरी साकार दिसत असलों तरी वास्तविक आकाराशीं आमचा संबंध उरला नाहीं. कारण, देहच मुळीं प्रत्यक्ष देवरूप बनला आहे. उंसाची साखर केल्यानंतर आतां कितीहि प्रयत्न केला तरी तिचा पुन्हां ऊंस होणें शक्य नाहीं. त्याप्रमाणें आम्ही गर्भवासांतून अमरत्वाच्या प्रांतांत दाखल झाल्यामुळें पुन्हां मागें गर्भवासांत जाणार नाहीं. ह्यापुढें आमचे सर्व भोग 'जोग' च आहेत. कारण, आतां भूत-मात्रीं हरीशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं.

ह्या अभंगांत तुकाराम महाराजांनीं ब्राह्मी स्थितीचा अनुभव वर्णिला आहे.

**एषा ब्राह्मी स्थितिः** पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।– गीता

अर्थ—ही ब्राह्मी स्थिति एकदां प्राप्त झाल्यावर पुनः मनुष्याला मोह प्राप्त होत नाहीं.

**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव** ।—गीता

अर्थ—हें पवित्र ज्ञान तुला लाभेल तेव्हां पुनः मोहाची भेट होणार नाहीं.

ब्राह्मी स्थितीला वेदोपनिषदांत 'तद् विष्णोः परमं पदम्'—विष्णूचें परम पद —असें नांव दिलें आहे. ह्यालाच गीतेंत भगवंतांनीं 'माझें परम धाम'

म्हटलें आहे. आणि तें प्राप्त झाल्यावर पुन्हा पूर्वपदावर येणें नाहीं असें दोनदां म्हटलें आहे.

**यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम ।**

—गीता, अ. ८ आणि अ. १५

ह्या गीतावचनावर ज्ञानेश्वर महाराजांनीं जें भाष्य केलें आहे त्याच्या आधारानें हा अभंग रचलेला आहे –

‘ तरी अग्निमाजीं आलें । जैसें इंधनचि अग्नि जालें ।
पाठी न निवडेचि कांहीं केलें । काष्ठपणें ॥

‘ना तरी साखरेचा माघौता । बुद्धिमंतपणेंहि करितां ।
ऊंस नव्हे पांडुसुता । जियापरी ॥’

‘लोहाचें कनक जालें । हें एक परिसेंचि केलें ।
आतां आणिक कैंचें तें गेलें । लोहत्व आणी ॥

म्हणौनि तूप होऊनि माघौतें । जेंवि दूधपणा न येचि निरुतें ।
तेंवि पावोनियां जयातें । पुनरावृत्ति नाहीं ॥’

‘पुढती जे तेथ गेले । ते न घेती माघौती पाउलें ।
महोदधीं कां मीनलें । स्रोत जैसे ॥

कां लवणाची कुंजरी । सूदलिया लवणसागरी होयचि ना माघारीं । परती जैसी ना ना गेलिया अंतराळा । न येतीची वन्हिज्वाळा । नाहीं तप्त लौहौनि जळा । निवणें जेवीं तेवीं मजशीं एकवर । जे जाले ज्ञानें चोखट; ते या पुनरावृत्तीची वाट । मोडली गात ज्ञानदेव ॥

या ओव्यांत ज्ञानेश्वर महाराजांनीं १ अग्नि–काष्ठ, २ उसाची साखर, ३ लोहकनक, ४ दुधाचें तूप, ५ महोदधिस्रोत, ६ लवण–कुंजरी ७ वन्ही ज्वाळा, ८ तप्त लोहावरचें पाणी, असे आठ दाखले दिले आहेत. पैकीं या अभंगांत तुकाराम महाराजांनीं साखरेचा दाखला उतरून घेतला आहे आणि ‘बीज भाजुनि केली लाही’ हा नवीन दाखला जोडला आहे.

# भक्तांचे अनुभव

## मी साई–भक्त कशी बनलें ?

**श्रीमती शांताबाई जोशी, केअर ऑफ्. बी. एस्. जोशी, बी. एस्. पी. स्ट्रीट नं. ९ सेक्टर नं. १०, क्वार्टर नं. ७, भिलई, मध्य प्रदेश; ह्या आपला अनुभव पुढील प्रमाणें कळवितातः—**

मी एका मिलिटरी हॉस्पिटलची इंचार्ज सिस्टर होतें. माझे मेडिकल ऑफिसर एक गुजराथी ( रिफ्युझी असून जातीयवादी ) होते. अर्थात मी महाराष्ट्रियन, कोकणस्थ ब्राह्मण, म्हणून मला काढून माझ्या जागीं ते आपली जातवाली आणण्याच्या प्रयत्नांत होते. व तशी त्याना एक दिवस संधी प्राप्त झाली. परंतु श्रीसाईंच्या कृपेनें त्यांतून मी कशी मुक्त झालें तें ऐका—

रात्रीं १२ वाजतां 'नाईट नर्स' मला घाबऱ्या घाबऱ्या बोलवायला आली; कसली केस आली आहे म्हटलें तर "सिस्टर तुम्हीं आधीं हॉस्पिटल-मध्यें चला. मला कांहीं सुचत नाहीं" असें म्हणून रडूं लागली. तेव्हां मी चट्कन तयार होऊन तिच्या बरोबर हॉस्पिटलांत गेलें. आणि तेथील दृश्य पाहून मटकन् खालींच बसलें.

आमच्या आऊट डोअर मधील ७०० रुपये किंमतीचा नवा इलेक्ट्रिक स्टरलायझर, ज्याला खरेदी करून पुरे दोन महिने झाले नव्हते, तो जळून खाक झाला होता. तेव्हां 'निष्काळजी' हा शेरा माझ्या माथीं पर्यायानें कां होईना बस-णार व १० वर्षांच्या सर्व्हिसला ग्रहण लागणार, असें वाटूं लागलें. कारण स्टरला-यझर जळून त्याच्या चारी बाजू रेग्युलेटर निखळून चारी दिशेला पडले होते. सर्व मेटल विरघळून टेबलावरून तों जमिनीवर इतस्ततः पाट वाहून थिजलेलें होतें.

आतां ज्या डिपार्टमेंटमधून साधीं इन्स्ट्रुमेंट्स् घड रिपेअर होत नसत तेथें हा स्टरलायझर कसा दुरुस्त होणार ?

मी अवाक् होऊन पहात होतें; नाईटनर्स व नाईटड्रेसर गर्भगळित झालेल्या होत्या. त्यांनाही मेडिकल ऑफिसरपुढें उभें राहायचें प्राणसंकट होतेंच !

मी घरीं जायला निघालें तेव्हां माझी ड्रेसर पुढें येऊन म्हणाली "सिस्टर ! तुम्ही माझी एक विनंती ऐकाल का ?" "तुम्ही शिरडीच्या साई-बाबांना 'हें संकट निर्विघ्नपणें दूर करा', अशी प्रार्थना करा. ते खात्रीनें धांवून

येतील तुमच्या हांकेला". मी कांहीं नास्तिक नव्हतें, पण कोण कुठले साईबाबा हें पण मला माहीत नव्हतें; पण मी मनांत हात जोडून " जय साईबाबा हा स्टरलायझर जळलेला दुरुस्त होऊन आमच्या पैकीं कोणावर ही ठपका येणार नाहीं असें करा. मी तुमच्या दर्शनाला येईन." अशी प्रार्थना केली.

दुसरे दिवशीं रविवार होता व इलेक्ट्रिक डिपार्टमेंटचा 'चार्जमन' सहज म्हणून माझ्या बंगल्यावर आला व त्याला मी तो स्टरलायझर दाखवून विनंती केली. हा स्टरलायझर तूं इमर्जन्सी रिपेअर म्हणून हॉस्पिटलसाठीं नव्हे माझ्या-साठीं म्हणून चार दिवसांत रिपेअर करून दे.

तो हंसला नि म्हणाला " काय जादूची कांडी थोडीच आहे माझ्या जवळ, कीं ती फिरवली त्यावर कीं झाला रिपेअर !" मनांत म्हटलें " बाबा, व्हा आतां आमच्यासाठीं जादूगार ". आणि खरोखरच बाबा भक्तांसाठीं जादूगार झाले.

सोमवारीं घाईघाईनें रिपेअर अर्जंट फार्म भरला व मेडिकल ऑफिसरची सही घ्यायला धडधडत्या छातीनें ऑफिसमध्यें शिरलें. त्यांच्या पुढें बुक ठेऊन विचारलें " तुम्ही स्टरलायझर पहायला येतां कीं, येथें आणवूं ?" ते बहुतेक कसल्या तरीं तारेंत असावे. ते म्हणाले " त्यांत काय पाहायचें ? लवकर पाठवून द्या म्हणजे झालें."

त्यांनीं पाहिलें असतें तर इन्क्वायरी, फाईन, बॅड रेकॉर्ड, डिस्चार्ज, सुद्धां ! या सर्वांतून बाबांनीं सर्व स्टाफची सुटका केली. " जय श्रीसाईबाबा" म्हणून प्रसन्न मनानें मी ऑफिसबाहेर पडलें. सर्व जणी माझी वाटच पहात उभ्या होत्या. माझा प्रफुल्ल चेहरा पाहून त्यांनीं पण बाबांना हात जोडले आणि काय सांगूं तुम्हाला ? रिपेअरला खरोखरच अशक्य वाटणारा स्टरलायझर सोम-वारीं पाठविला, तो बुधवारीं जसा होता तसा अगदीं नवा होऊन आला. अशी ही साईमाऊली भक्तांसाठीं समाधी सोडून धांवून आली.

## कर्तव्याचरण हीच भक्ति

मला भगवंताचा भक्त बनायचें आहे ही अभिलाषा मनांत नेहमीं जागृत असावी. कर्तव्याचें आचरण करीत असतां अंतःकरणांत त्याचें स्मरण जागृत असावें. मला हें त्याच्यासाठीं करायचें आहे. हीच आहे माझी भक्ति. त्याबद्दल आशा, माया, ममता कांहीं बाळगायची नाहीं. मग पहा ! तुम्हांला त्याचें काय फळ मिळतें तें !

# नामसाधनेचें महत्त्व

लेखक : प्रा. के. वि. बेलसरे

( लेखांक शेवटचा )

211

## नामाचा सहवास

'भगवंत माझ्यासाठीं आहे' अशी भावना असल्यानें आपल्या वासना पुरवाव्या असें मनापासून वाटतें. आपल्या वासना पुरल्या तर आपण पूर्ण आनंदी बनूं अशी प्रामाणिक श्रद्धा असते. नामसाधनेच्या दुसऱ्या अवस्थेंत पदार्पण केल्यावर ही श्रद्धा डळमळूं लागते. आपल्याला हवें तें भगवंतानें बिनतक्रार पुरवावें हा आग्रह धरणें वेडेपणाचें आहे. आपल्या वासना तरी कोठें धड आहेत? मनांत येणाऱ्या सर्व वासना जर भगवंत पुरवूं लागता तर आपलें जीवन अधिक दुःखमय बनेल. आपण त्याचें नाम घेतों म्हणजे जणूं काय त्याच्यावर उपकार करतों असें समजून त्याच्यापाशीं वासनातृप्तीचा हट्ट धरणें हें देहबुद्धीचें किंवा अज्ञानाचें लक्षण आहे. खरें म्हणजे आपल्या वासनाच भगवंताच्या आड येतात हें आपल्या लक्षांत येत नाहीं. हें लक्षांत येऊं लागलें कीं अंतःकरण शुद्ध होण्यास आरंभ झाला असें समजावें. वैखरीनें नामाचा चांगला अभ्यास झाला म्हणजे तोंड बंद असून, जीभ व ओठ न हालतां आंतमध्यें नाम चालू राहतें. पुष्कळ वेळां आंतल्या आंत जीभ थोडी हालते आणि गळ्यांत म्हणजे आवाजाच्या पेटीमध्यें नामाचा स्पंद अनुभवास येतो. वैखरी तर नाहीं पण मध्यमा सुरू झाली नाहीं असें हें नाम असतें. थोडा वेळ तोंड बंद करून नाम चाललें कीं बंद पडतें. तोंड उघडून वैखरीनें जप केला कीं पुन्हां तोंड बंद करून तें चालू होतें. वैखरीनें नाम घेत असतां त्याकडे विशेष लक्ष द्यावें लागत नाहीं; पण तोंड बंद करून नाम सारखें चालू ठेवण्यास अधिक लक्ष द्यावें लागतें. हाच चित्त नामामध्यें केंद्रित होण्याचा आरंभ होय. असें जरी झालें तरी मन आपल्या मार्गानें नाना तऱ्हेचे विचार करीत भरकटत असतें. नामाचा अभ्यास आणखी वाढवल्यास नाम मध्येंमध्यें चालू लागतें. जड व सूक्ष्म त्यांना जोडतें म्हणून मध्यमा,

ओठ आणि जीभ यांची मुळींच हालचाल न होतां, इतकेंच नव्हे तर आवाजाच्या पेटीमध्यें अत्यंत सूक्ष्म स्पंदन होऊन जें नाम चालतें ते मध्येंमध्यें चालतें. आपल्या मेंदूमध्यें जें वाणीचें केंद्र आहे तेवढेंच काम करीत राहिल्यानें मध्यमेंत चालणारें नाम डोक्यांत चालतें असें आंतमध्यें समजतें. अशा रीतीनें चाललेलें नाम अधिक खोल गेलें असल्यामुळें शरीराच्या उठणेंबसणें, खाणेंपिणें, येणेंजाणें वगैरे सामान्य हालचाली होत राहिल्या तरी नामांत खंड पडत नाहीं. अर्थात पुष्कळ बोलल्यावर थकवा येऊन मनुष्य जसा गप्प बसतो त्याप्रमाणें मेंदूतील वाणीकेंद्राला थकवा आला कीं नाम आपोआप थांबतें तरी ज्या वेळीं नाम चालू असतें त्या वेळीं त्याच्या सहवासाचा अनुभव येतो. या सहवासाचा एक विलक्षण परिणाम असा दिसतो कीं अंतःकरणामध्यें ढवळाढवळ सुरू होते, वासनांना दाब बसून त्या बंड करून उठतात. आंत एक द्वंद्व निर्माण होतें. वासना जीवांना एकीकडे खेचते तर नाम भगवंताकडे खेचतें. आपण नाइलाजानें वासनांच्या मागें खेचलों गेलों तरी ज्या वासना नीतिधर्माला व माणुसकीला धरून नसतात त्यांची लाज वाटूं लागते. आपल्या दोषांची तीव्र जाणीव होऊन आपण खरे चांगले नाहीं हें मनाला पटतें. वासनेशीं होणाऱ्या झटापटींत पुष्कळ वेळां हरल्यानें भगवंताला शरण गेल्याशिवाय उपाय नाहीं ही खात्री होते. "मी भगवंताचा आहें, मी त्याचें नाम घेतों म्हणून त्याला शोभेल असें वागणें मला जरूर आहे" अशी भावना निर्माण झाल्यानें कर्तव्याची जागृति येते. जगाला सुधारण्याच्या नादीं न लागतां आधीं स्वतः सुधारलें पाहिजे हा विचार पक्का होतो. घरादारांत, नोकरीचाकरींत, व्यवहारांत आणि समाजांत आपलें कर्तव्य मनापसून करून राहिलेला वेळ नामस्मरणांत जातो. मध्यमेमध्यें चालणारें नाम आंतल्याआंत ऐकण्याचा अभ्यास झाल्यास थोडा थोडा मनाचा लय लागतो. त्यानें तात्पुरती कां होईना जीवाला विश्रांति मिळते.

## ११. नामांतून भाव :

भगवंताच्या मार्गामध्यें मुक्कामाला पोंचण्यासाठीं स्वतःची तळमळ, तिच्या पोटीं जन्मास येणारी शरणागति आणि भगवंताची कृपा अशा तीन गोष्टींची जरूर असते. "मला भगवंत हवा" अशी थोडी कां होईना तळमळ निर्माण होणें हें भगवंताच्या दयेचें लक्षण आहे. पण आपण त्याला शरण गेल्याशिवाय

त्याच्या कृपेचा खरा अनुभव येत नाही. "मी खरा नसून तूंच खरा आहेस, तुझ्या सत्तेनें जसा मी जगतों त्याचप्रमाणें जगांतील सर्व घटना घडतात." अशी आंतून खात्री वाटूं लागणें हें शरणागतीचें पहिलें पाऊल आहे. खरें पाहिलें असतां भगवंताच्या सत्तेनेंच जगातील यच्चयावत् हालचाली घडत असतात. आपल्याला त्याची जाणीव नसते. नामाचा सहवास घडूं लागल्यावर ही जाणीव आपोआप निर्माण होते. तिला भाव असें म्हणतात. भाव म्हणजे भगवंताविषयीं अस्तित्वबुद्धि. भगवंत आहे हें ज्याला खऱ्या अर्थानें पटूं लागलें त्याच्या मनांत नामाचें अनुसंधान आपोआप राहूं लागतें. अनुसंधानाच्या तीन पायऱ्या आहेत. चिंतन, निदिध्यासन आणि प्रेम अशा तीन अवस्थांनीं अनुसंधान पक्व होत जातें. चिंतनामध्यें जागेपणीं तेवढा भगवंताचा विचार टिकतो आणि तोहि मनाच्या वरवरच्या थरावर असतो. निदिध्यासामध्यें तो विचार मनाच्या खालच्या थरांत घुसल्यामुळें जागेपणींच काय पण झोपेंतसुद्धां कायम राहतो. मनाच्या सर्व हालचाली त्याच विचारानें व्यापून गेल्यामुळें कांहीं सुचत नाहीं. आणि प्रेमामध्यें मनाचें स्वरूप आमूलाग्र बदलून जातें व त्या विचाराशीं तद्रूपता येते. अनुसंधान ही कला आहे, अभ्यासानें साध्य होणारी आहे. चिंतन व निदिध्यासन चालू असतांना नाम डोक्यांतून हृदयांत उतरतें. हृदयांत नाम उतरलें म्हणजे तें पश्यन्तीमध्यें शिरलें असें समजावें. पश्यन्तीवाणी अर्थरूप असून मध्यमेच्या मानानें तिचा विस्तार फार मोठा आहे. सामान्यतः मनन मध्यमेमध्यें चालतें, तर चिंतन पश्यन्तीमध्यें चालतें. पश्यन्तीमध्यें नामस्मरण सुरू झालें म्हणजे नामाच्या शब्दाकडे लक्ष आपोआप कमी होतें. एकीकडे आंतमध्यें नाम चाललें अशी स्पष्ट जाणीव राहून व्यवहारांतील ओघानें येणारीं कर्में कर्तव्यबुद्धीनें होत राहतात. इतकेंच नव्हे तर घडणाऱ्या प्रत्येक घटनेमध्यें भगवंताची सत्ता कार्य करीत आहे असें मनापासून वाटतें. रोजच्या जीवनांत घडणाऱ्या कमीजास्त गोष्टी अशाच चालायच्या, त्यांच्याकडे सर्व लक्ष घालवून आपली शक्ति वाया घालवण्यांत अर्थ नाहीं अशी पक्की खात्री झाल्यानें अनुसंधान न तुटण्याचा उपाय शोधला जातो. हा अभ्यास चालू झाला म्हणजे नामधारकाला साधक असें म्हणतात. हृदयांतील नाम खंड न पडतां शक्य तितकें अधिक काळ चालावें म्हणून साधक, मानसपूजा करतो. मानसपूजा हा कल्पनेचा विलास आहे. आपल्या हृदयांत आपली इष्टदेवता प्रत्यक्ष आहे अशी कल्पना करून तिची मनापासून पूजा करणें आणि "मी त्याचा आहे" अशी जाणीव रात्रंदिवस जागृत ठेवणें हें अनुसंधानाचें मर्म आहे. पश्यन्तींत

नाम घेण्याची युक्ति साधली तरी मनांतील विकार व भगवंताशिवाय इतर विचार सर्वच नाहींसे झालेले नसतात. म्हणून विकार विचारांना आवरून, आपलें नाम स्थिर राखून आणि भगवंताच्या मूर्तीला घट्ट धरून व्यवहारांतील कर्मे योग्य रीतीनें करण्यास मोठी सावधानता लागते. सुरवातीला व्यवहारांतील कर्मांच्या गुंतागुंतींत उतरलें कीं नाम विसरून जातें व आपण भगवंताचे आहोंत याचाहि विसर पडतो. असें न होण्यास अर्थात् व्यवहाराचा परिणाम होऊन नामाच्या चिंतनांत व्यत्यय न यावा यासाठीं साधक अधिक शरणागति मागतो. शरणागतीची बुद्धि होणें हीच मुळीं भगवंताची कृपा आंत उतरल्याची खूण आहे. त्या कृपेचा अधिक प्रभाव अनुभवास येण्यास साधकाला सर्व बाजूनीं शरणागत व्हावें लागतें. तो म्हणतो, " भगवंता, माझा पैसा, माझें घरदार, माझीं माणसें, माझी विद्या, बुद्धि, शक्ति, युक्ति ही सर्वकांहीं तुझी देणगी आहे. तुझ्यामुळें मी आहें. तुझ्याशिवाय मीं जगूं शकणार नाहीं अशी माझी वृत्ति बनव. " या अवस्थेंत साधकाला नित्यनियमाचें विशेष महत्त्व असतें. रोज अगदीं नियमानें अभ्यास केला तरच नामाचें ताजेपण टिकतें आणि मानसपूजादेखील मनासारखी होऊन समाधान वाटतें.

## १२. भावांतून निष्ठा :

हृदयांत सुरू झालेलें नाम तेथें स्थिर झालें कीं निष्ठा निर्माण होते. निष्ठा ही भाग्यवंताचें लक्षण आहे. कारण अंतःकरणांत नाम स्थिर होणें म्हणजे भगवंताच्या उंबरठ्यांत पोंचणें होय. भगवंताच्या सत्तेनें आपलें जीवन चालतें असें वाटणें हें भावाचें लक्षण तर " त्याच्याच सत्तेनें मी जगतों, त्याच्याशिवाय मी असूंच शकत नाहीं " असें निःसंशय वाटणें हें निष्ठेचें लक्षण. भगवंताशिवाय जगणें म्हणजे जिवंत असून मेल्यासारखें असल्यानें सर्व प्रापंचिक वासना आपोआप भगवंताकडे वळतात. भगवंताचें अस्तित्व आपल्यामध्यें अधिकाधिक प्रकट होत जावें, त्याच्या सत्तेनें शरीर व मन भरून जावें, आपल्या हातून त्याचेंच कार्य व्हावें, तो ठेवील त्या परिस्थितींत आनंदानें राहावें अशी महत्त्वाकांक्षा साधकाच्या मनांत निर्माण होते. रात्रंदिवस हृदयामध्यें नामाचा ध्वनि चालल्यानें खऱ्या अर्थानें तो नामाच्या नादीं लागतो. घरींदारीं, जागेपणीं व झोंपेंतसुद्धां नाम चालू राहतें. पण मागच्या अवस्थेंत चालू असणारें नाम यांत महत्त्वाचा असा फरक असतो कीं साधक नामामध्यें रंगून जाऊं लागतो. व्यव-

हारांतील अति जरूर असलेले कर्म झालें रे झालें कीं तो अंतरांत नामांत गुंतून जातो. नामस्मरणाला इतकी गति, खोली व तेज येते कीं तो त्याचा स्वभावच बनून जातो. येथें भगवंताची कृपाशक्ति त्याच्या जीवाचा ताबा घेते. ती कृपाशक्ति आपल्याकडून नाम घेवविते. आपलें साधन तीच पूर्णतेला नेणार अशी खात्री असल्यानें साधक सर्वस्वीं तिच्या आधीन होतो. पूर्ण शरणागतीची सुरुवात हीच होय. भगवंताच्या कृपेचा खेळ काय वर्णन करावा ! एखादी आई आपल्या तान्ह्या मुलाला जशी जपते, त्याहिपेक्षां भगवंताची कृपा साधकाला सांभाळते. सर्व प्रकारच्या संकटांतून व अडचणींतून ती त्याला पार पाडते, इतकेंच नव्हे तर संकटें, अडचणी व दोष साधकाच्या प्रगतीला मदतच करतात. कृपेच्या सर्वस्वीं ताब्यांत जाण्याची ही अवस्था इतकी गोड आहे कीं ती भोगतांना साधकाला भगवंताची नुसती आठवण झाल्याबरोबर अश्रु वाहूं लागतात, गळा दाटून येतो आणि अंगावर रोमांच उभे राहतात. कांहीं साधकांना एकांतांत जाऊन मौन पाळून नुसतें नाम घेत राहावें असें वाटतें. क्वचित् एखाद्याला काव्यस्फूर्तिदेखील होते. आपल्या मागेंपुढें भगवंत उभा आहे अशी निःसंशय भावना असल्यानें साधकाचें मन विशाल, निर्भय आणि प्रेमळ बनतें, त्याला संकटाची भीति वाटत नाहीं. " तूं जवळ हवास, मग तूं ठेवशील तसा मी आनंदानें राहीन, " असें भगवंताला तो मनापासून सांगतो. नामांत रंगलेला तो कोणाचाहि द्वेषमत्सर न करतां आणि आपलें शत्रुत्व करणाऱ्यांना क्षमा करीत आपला पुढील मार्ग आक्रमण करीत राहतो.

## १३. निष्ठेतून प्रेम

आपलें जीवन सर्वस्वीं भगवंताला वाहिलेलें असलें तरी अजून थोडा 'मी' शिल्लक असतो. तो देखील भगवंतामध्यें विलीन केल्याशिवाय साधकाला चैन पडत नाहीं. मीपणा कमी करीत जाणें सोपें जातें. पण मुळासकट त्याचा नाश करणें अत्यंत दुष्कर आहे. म्हणून येथपर्यंत आल्यानंतर साधक हतबल होऊन निराश बनतो. अन्य मार्गानें जाणाऱ्या साधकांना या निराशेचा झटका फारच जोरानें बसतो. नामाच्या मार्गानें जाणाऱ्या साधकाला त्या मानानें पुष्कळच कमी त्रास होतो. स्वतःला भगवंताच्या हवालीं केलें असल्यानें त्याची कृपा साधकाची काळजी घेत असतेच. तिच्या इच्छेनेंच हृदयांत चालणारें नाम तळमळीनें भरून येऊं लागतें. ही तळमळ आपोआप इतकी वाढते कीं शेवटीं एकच भयंकर नाम

साधकाच्या मीपणाला आनंदरूपी भगवंतामध्यें बुचकळून टाकतें. साधक तिन्ही अवस्थांच्या पलीकडे असणाऱ्या तुर्यावस्थेंत जाऊन भगवंताशीं एकरूप होतो. या आनंदमय अवस्थेचें वर्णन काय करावें! साधकाला जिकडे तिकडे देवाचें रूप दिसूं लागतें. त्याचें स्थलकालाचें भान हरपतें. त्याची देहबुद्धि मरून तो स्वतः देवच बनतो. या वेळीं एका नामावांचून दुसरें कांहीं त्याला करतांच येत नाहीं. त्याचें उठणें—बसणें, खाणेंपिणें सगळें नामांतच चालतें. त्याची झोंप नाहींशी होते. कित्येक वेळां अनावर झाल्यानें मोठ्यानें नाम घेत तो नाचूं लागतो. त्याचें शरीर, मन बुद्धि, आत्मा सगळीं नाममय बनल्यानें त्याच्या शरीराच्या कोणत्याहि भागाला कान लावला तर नामच ऐकूं येतें. परावाणींतून नाम आपोआप स्फुरतें व अनाहताचा झंकार चोवीस तास आंतून त्याला ऐकूं येतो. आनंदाच्या दर्शनाची ही पहिली मस्ती हळहळू जिरूं लागते. "मी ओंकार किंवा सच्चिदानंदस्वरूप नाम आहें" ही वृत्तिदेखील लीन झाल्यावर तो पूर्ण सिद्ध बनतो. आत्मानंद पचल्यामुळें असा सिद्धपुरुष अगदीं साध्या माणसासारखा भानावर राहून व्यवहार करतो. प्रारब्धानें येणाऱ्या कर्मामध्यें वागत असतां जो जो भेटेल त्याला सन्मार्गावर आणून भगवंताच्या नामाला लावण्याचे महदुपकार तो जगावर करतो. त्याच्या संगतीनें अनेक जीवांचा उद्धार होतो, इतकेंच नव्हे तर त्यानें देह ठेवल्यावर देखील त्याच्या प्रेमाची सत्ता काम करते व हजारों लोक नामाला लागतात.

### १४. अमृतवल्ली नाम :

प्रापंचिकांना काय किंवा सर्वसंगपरित्याग केलेल्या संन्याशांना काय, नामसाधना ही अमृतवल्ली आहे. "नाम घेणें हा माझा धर्म आहे; नाम घेणें हें माझें आद्यकर्तव्य आहे, नामाशिवाय जगणें म्हणजे मेल्यासारखेंच आहे, नाम घेण्यांत माझें खरें कल्याण आहे, किंबहुना, नाम घेण्यासाठींच मी जन्माला आलों असून नामांत रंगून जाऊनच देह ठेवीन" अशा निश्चयानें, आस्थेनें व प्रज्वलित भावनेनें नाम घेणें अवश्य आहे. असा निश्चय व अशी भावना आरंभीं स्वाभाविकपणें नसते. परंतु जसें येईल तसें नाम घेत गेल्यानें तेंच नाम आपल्याला एकेक पाऊल पुढें नेतें आणि ध्येय गांठून देतें. नामांतच भगवंताचें प्रेम गुप्त असल्यानें नाम घेतां घेतां अंतःकरण शुद्ध होत जातें व तेथें प्रेम प्रकट होतें. आज जेवढा वेळ रिकामा मिळेल तेवढा सगळा नामांत घालवण्याचा अभ्यास केल्यास हळुहळूं आपल्या वृत्तीवर परिणाम घडून त्यामधूनच

भगवंताचें प्रेम निर्माण होईल याबद्दल संशय येऊं देऊं नये. आपला संशय, आपली अस्थिर बुद्धि आणि आपले विकल्प हेच नामांत रंगण्याच्या आड येतात. नामाच्या आड दुसरें कोणी येत नसून आपण स्वतःच येत असतों. लग्न झाल्यावर पतिव्रता स्त्री नवऱ्याशीं जशी एकरूप होऊन जाते तसें आपल्या वृत्तीचें लग्न नामांशीं लावावें. वृत्ति नामरूप बनली कीं, भगवंताचें दर्शन होतें. आपण नाम घ्यावें, तें आपल्याच कानांनीं ऐकावें आणि तें घेतां घेतां शेवटीं त्यांतच स्वतःला विसरून जावें. हीच नामसाधना असून हाच आनंदप्राप्तीचा राजमार्ग होय. भगवंताची सर्व नामें सारखींच, त्यांच्यांत फरक नाहीं. नाम हें साध्य व साधनहि आहे. नाम हें सगुण व निर्गुणहि आहे. नाम हा सत्संगाचा पाया व कळसहि आहे. नाम हा जीव आणि शिव यांमधील दुवा आहे. संतांना नाम अति प्रिय असल्यानें जो मनापासून नाम घेतो त्याचा शोध करीत ते येतात व त्याच्यावर कृपा करतात. म्हणून नाम सद्‌गुरूची गांठ घालून देतें. नाम घेणाऱ्याच्या मागें सद्‌गुरू प्रेमरूपानें राहतात. नामानें देहबुद्धि वितळते आणि भगवत्स्वरूप अनुभवास येतें. नाम कसेंहि घ्यावें. घेणाऱ्याची योग्य दिशेनें वाढ होऊन तो भगवंतापाशीं खात्रीनें पोहोचेल.

## १५. उपसंहार :

नामसाधना हा भगवंताच्या प्राप्तीचा सहज मार्ग आहे. त्यामध्यें कष्ट नाहींत, अव्यवहारीपणा नाहीं, प्रपंचाची धुळधाण नाहीं, ऐश्वर्याबद्दल तिरस्कार नाहीं, लौकिक ज्ञानाची तुच्छता नाहीं किंवा जगांतील पराक्रमाबद्दल उदासीनता नाहीं. आनंदांतून सहज निर्माण झालेलें हें जग आनंदाच्या पार्श्वभूमीवर सहजपणें चालतें. प्रत्येक जीवाच्या अंतर्यामीं सहजपणें राहणारा आनंद सहजपणें अनुभवास आला पाहिजे. त्याचें साधन देखील अत्यंत सहज आणि सार्वजनिक असणें जरूर आहे. तें साधन म्हणजे नाम होय. नामसाधनाचे तीन मुक्काम सांगतां येतात. पहिल्या मुक्कामांत मध्यमा वाणीमध्यें नाम चालतें. मी त्याचा आहें अशी भावना असते. मी खरा असून भगवंत माझ्यासाठीं आहे असें वाटतें. भगवंताचें अस्तित्व मनाला पटून कर्तव्यबुद्धीनें कर्में घडतात आणि आपण इच्छेला शरण जातों. दुसऱ्या मुक्कामांत नाम अधिक खोल जाऊन पश्यन्तींत चालतें. भगवंत खरा असून मी त्याच्यासाठीं आहे, ही भावना उदय पावते, देहबुद्धि लवचिक बनून सद्‌बुद्धीचा आविष्कार होऊं लागतो. नामांत ध्यान लागूं लागल्यानें भगवंताचें

सान्निध्य अनुभवास येतें आणि मी तुझा आहें, हें अनुसंधान व्यवहारांत देखील टिकतें. तिसऱ्या मुक्कामांत हृदयांत स्थिर झालेलें नाम आणखी खोल जाऊन सबंध जीवाला व्यापून टाकतें, पूर्ण शरणागति झाल्यानें भगवंत तेवढाच खरा व मी नाहींच अशी तन्मयता होते. अखंड जप चालल्यानें सहजसमाधीमध्यें सारखें राहतां येतें, आनंदाशिवाय दुसरी प्रचीति येतच नाहीं; जिकडेतिकडे आनंदाचें साम्राज्य आढळतें, सर्वांवर प्रेम करण्याची युक्ति साधते आणि दुःखानें गांजलेल्या लोकांना नामसाधना शिकवण्यांत काळ जातो. आजपर्यंत जे पूर्णत्वाला पोंचलेले थोर साधुसंत होऊन गेले ते सर्व याच मार्गानें गेले आणि आनंदमय बनले. आनंदप्राप्तीसाठीं नामरूपी आनंद साधनच सर्वोत्तम साधन आहे. साधनाचा आरंभ नामांत तसा त्याचा अंतदेखील नामांतच होतो. मन नामाला चिकटलें तर भगवंताला तेथें प्रकट झाल्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं. जो नियम श्रीसद्‌गुरूंना लागू पडतो, तोच सर्वांना. म्हणून ज्याला समाधान हवें असेल त्यानें शंका सोडून नामसाधना करावी.

---

श्रीसाईबाबांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी-निमित्त प्रचारकार्यासाठीं १४"×२३" आकाराचे तीन रंगी पोस्टर्स तयार केले आहेत. ज्या भक्तांना आपल्या भागांत लावण्यासाठीं पोस्टर्स हवे असतील त्यानीं कृपया संस्थानचे मुंबई कचेरीशीं पत्रव्यवहार करून पोस्टर्स मागवून घ्यावे व प्रमुख ठिकाणीं लावून साई फाउंडेशनच्या प्रचारकार्यास हातभार लावावा अशी विनंती आहे.

पोस्टर्स विनामूल्य आहेत.

# कल्याणकारी कथा

215

—संत विनोबा

## दोन शिष्यांची गोष्ट

एक होते गुरु. त्यांचे होते दोन शिष्य. दोन्हीं शिष्यांचें आपल्या गुरूवर अतिशय प्रेम होतें. गुरूच्या सेवेसाठीं ते सदैव तत्पर असत. गुरूनीं पाणी मागावं आणि दोन्हीं शिष्यांनीं धावत जाऊन पाण्याचें भांडें घेऊन यावं. गुरूनीं दांत घांसण्यासाठीं मंजन मागावें आणि दोघांही शिष्यांनीं हातांत मंजन घेऊन गुरुजीसमोर उभे रहावें. शिष्यांच्या प्रेमापायीं गुरुजींना दोघांचीही सेवा स्वीकारावी लागे. दोघांच्याही भांड्यांतलं पाणी प्यावं लागे. दोघांनीही आणलेल्या मंजनानें त्यांना तोंड धुवावं लागे. गुरुजीनीं असं केलं नाहीं तर दुसरा शिष्य हिरमुसला होई.

एक दिवस गुरु प्रवासांतून आले. प्रवास दूरचा असल्यामुळं ते थकून गेले होते. त्यांनीं शिष्यांना हाक मारली आणि म्हटलं:

" आज पाय खूप दुखत आहेत. "

गुरुजींची आज्ञा होताच दोन्ही शिष्य दत्त म्हणून समोर उभे राहिले. गुरुजींनीं विचार केला कीं आतां वाटणी करून दिल्याशिवाय निभायचं नाहीं. शेवटीं गुरुजींनीं दोन्ही शिष्यांना जवळ बसवलं आणि दोघांना दोन पायांची सेवा करायला सांगितलं.

गुरुजींची ही हुषारी पाहून दोन्ही शिष्य अत्यंत खूष झाले. समोरासमोर बसून आपापला पाय दाबत राहिले. थोड्याच वेळांत गुरुजींना आराम वाटला. त्यांचा जरा डोळा लागला.

झोपेंत गुरुजींचा डावा पाय उजव्या पायावर आदळला गेला. दोन्ही शिष्य तिथं होतेच. उजवा पायवाल्या शिष्याला ही गोष्ट आवडली नाहीं. " तुझा पाय आणि माझ्यावर ? " असं म्हणून त्यानं जोरांत गुरुजींचा डावा पाय पिरगळला आणि बाजूला फेकला. हें सारं डावापायवाल्या शिष्याला कसं आवडणार ? त्यानं त्याहीपेक्षा जोरानं गुरुजीचा उजवा पाय पिरगळला आणि

दुसरीकडे फेकला. या ओढाताणींत गुरुजींची झोप पार उडाली. त्यांनीं विव्ह-ळून समोर पाहिलं.

दोन्ही शिष्य गुरुजींच्या पायावर आघात करीत जोरजोरांत भांडत होते!

शिष्यांचें भांडण पाहून तशाहि स्थितींत गुरुजींना हसूं आलें. ते म्हणाले:

"अरे हें काय करीत आहांत? तुम्हाला मी पाय दाबायला बसवलं कीं पिरगळायला? तुम्ही कोणताहि पाय पिरगळला तरी वेदना मला होतात. तुमच्या हें कसं लक्षांत येत नाहीं?"

गुरुजींनी कानउघाडणी केल्यावर दोन्ही शिष्य शरमिंदे झाले.

आजकाल समाजांतसुद्धा असंच चाललं आहे. एका गावाचे नागरिक असूनहि आम्ही परस्परांची फसवणूक करतों. यामुळं गावांत विषमता आणि भेदभाव यांना ऊत येतो. गरीब-श्रीमंत असे वर्ग निर्माण होतात. काहीं लोक खूप सुखी होऊन काहीं अत्यंत दरिद्री होतात. याचं कारण एकच. आणि तें म्हणजे परस्पर प्रेमाचा अभाव. प्रत्येकाच्यामध्यें ईर्षा आणि द्वेष निर्माण झाला आहे. वैराची भावना जागृत झाली आहे. आणि याचा परिणाम म्हणून गाव बरबाद होऊं लागला आहे. समाजसेवेच्या नांवावरसुद्धा आपल्या वेगवेगळ्या यंत्रणा असाच व्यवहार करीत असतात.

विनोबा म्हणतात, गावांतले सगळे नागरिक परस्परांचे भाऊ आहेत. गावांत कांही लोक दुःखी असतील तर तो संपूर्ण गांव दुःखी आहे असं मानलं पाहिजे आणि सगळे सुखी असतील तरच सारा गांव सुखी आहे असं मानलं पाहिजे.

---

## गोवर्धन पर्वत

ही गोकुळ–मथुरेची गोष्ट आहे.

यमुना नदीला नेहमीं पूर यायचा आणि दरवर्षीं गवळ्यांचीं घरं, चारा आणि गुरंढोरं वहात जायचीं. या नैसर्गिक संकटांतून वाचण्यासाठीं गोकुळांतले गवळी नेहमीं होमहवन व पूजाअर्चा करीत रहायचे. परंतु महापुराचं संकट कधीं कमी व्हायचं नाहीं.

भगवान श्रीकृष्णानं या संकटाचा विचार केला आणि उपाय शोधला. गोकुळवासि-यांचा मुख्य आधार गोधन. या गोधनाचं व्यवस्थित रक्षण आणि संवर्धन केल्या-

शिवाय संकट पार होणार नाहीं. होमहवन आणि पूजाअर्चा कामीं पडणार नाहीं. त्यापेक्षा सारा गावच एखाद्या उंच जागीं वसवला तर? पुराचं संकट तिथं काहींच करूं शकणार नाहीं, असा विचार श्रीकृष्णानं केला आणि चारा-पाण्यानें युक्त अशी उंचवटयाची जागा पाहून नवी वस्ती वसविली. यामुळं गायी-वासरांचं स्वास्थ्य सुधारलं. दूधदुभतं भरपूर मिळायला लागलं. लोकांची शारीरिक आणि आर्थिक स्थिति पार बदलून गेली. श्रीकृष्णाचं हें साहस जणूं गोवर्धन उचलावा तसं ठरलं. सर्व गवळ्यांनीं त्याची कल्पना मन लावून अमलांत आणली म्हणून हें होऊं शकलें.

विनोबा म्हणतात. सांठविण्याची वृत्ति, स्वार्थ, लोभ आणि मालकी हक्काची भावना या गोष्टींमुळं पराकोटीला पोंचलेली आजची विषमता समूळ नष्ट करावयाची असेल तर त्यासाठीं भूदानाचा आणि सर्वोदयाचा विचार पसरविला पाहिजे. हें काम केवळ माझ्या एकट्यानं वा मूठभर कार्यकर्त्यांकडून नाहीं व्हायचं. ज्याप्रमाणं गोकुळांतल्या गोपालांनीं काठीचा टेकू दिला त्याच-प्रमाणं समाजांतील सर्व स्त्रीपुरुषांचा मला सहारा मिळाला पाहिजे. असं जेव्हां होईल तेव्हा आपोआपच सर्वोदय होईल. सर्व-कल्याण होईल.

—×—

## आई :

तिचं नांव काय असेल माहीत नाहीं पण खरोखरच ती मोहल्लयांतील सर्वांची आई होती. तिचा स्वभाव शांत आणि प्रेमळ होता. चवताळलेला दुष्ट माणूससुद्धा तिच्यासमोर आला कीं शांत व्हायचा.

तिला स्वच्छता खूप आवडायची. तिचं घर ओसरी आणि आंगण सदा आरशासारखं स्वच्छ असायचं. पिण्याच्या पाण्याचं मडकं आणि भांडीं नेहमीं लखलखत असायचीं. कपडे ती स्वतः धुवायची. समोर उभी राहून वाळवायची आणि सुंदर घड्या करून कपाटांत ठेवायची. घरांतली प्रत्येक वस्तू टापटिपीनं ठेवणं हा जणु तिचा स्वभाव बनला होता. यामुळं तिचं घर नेहमीं स्वच्छ, सुंदर आणि नीटनेटकं दिसायचं.

तिच्या घरीं जेव्हां कुणी पाहुणा येई तेव्हां ती मनापासून त्याचं स्वागत करायची. मोठ्या प्रेमानं ती त्याला साधंच पण स्वादिष्ट जेवण द्यायची. एकदां

तिच्या घरचं स्वागत उपभोगलेला पाहुणा कधीं म्हणून तिला विसरायचा नाहीं.

ती रोज सकाळीं पांच वाजतां झोपेंतून उठायची आणि रात्रीं दहा वाजता झोपायची. मी तिला कधींच रिकामी बसलेली पाहिली नाहीं. कधी कुणाची निंदा करतांना पाहिलं नाहीं. कोणी निंदा करणारा तिच्याजवळ आलाच तर ती हंसत त्याला टाळायची आणि विषय बदलायची.

गावांतील अस्पृश्य वर्गाच्या लोकांना ताकासाठीं गावभर भटकावं लागे. परंतु ज्या दिवशीं हिच्या घरीं ताक व्हायचं त्या दिवशीं सर्वांच्या भांड्याला ताकाचा स्पर्श व्हायचा. ती म्हणायची :

"चार भांडीं पाणी अधिक घालायचा तेवढा त्रास ! पण तेवढ्यानं काम साधतं. प्रत्येकाला ताक देता येतं."

मोहल्ल्यांतील कितीतरी स्त्रियांना नस ओढण्याची, पान खाण्याची किंवा चहाची संवय आहे. पण या माउलीला या पैकीं एकहि लागत नाहीं. दोनदा सर्वांना भरवायचं आणि त्यानंतर आपण जेवायचं ही तिची पद्धति आहे.

मी तिच्या घरांत कोणालाच आवाज चढवून बोलतांना पाहिलं नाहीं. ती आपल्या धाकट्या नातवालाहि अदबशीर 'रामजी' म्हणून हाक मारते. मग दुसरा कोणी उद्धटपणानं कसा बोलेल ? ती सर्वांनाच प्रेमानं व सन्मानानं वागविते. सर्वांशी नम्रतेचा व सभ्यतेचा व्यवहार करते. त्यामुळं घरातील मुलांच्या तोंडांत शिवी कधींच दिसत नाहीं. वास्तविक ती शिकली-सवरलेली बाई नाहीं. परतु रात्रीच्या वेळीं कुटुंबातील सर्व मुलांना एकत्र घेऊन नाना प्रकाराच्या संस्कारी कथा ती सांगत राहते. अशी स्त्री ही थोर माता होय, अनेक गुरूंचं काम ती एकटी करीत असते.

आईचं हें आईपण म्हणजे परममंगल अशी थोर शक्ति होय. म्हणूनच विनोबाजी म्हणतात कीं—माझ्यांत जी काहीं श्रद्धा, भक्ति आणि सद्गुण असतील ती माझ्या आईनं मला दिलेली थोर देणगी आहे.

---

—दुसऱ्याच्या मनाला दुःख, खेद होईल असा शब्द आपल्या तोंडांतून कधींही बाहेर पडणार नाहीं, याची आपण काळजी बाळगली पाहिजे. एकदा मुखावाटे शब्द बाहेर गेला तो गेला ! तो कसा मधु–मधुर नि मनाला आनंद देणारा असावा.

# संत श्रेष्ठाची पंढरी

लेखक : द. मो. चित्रे

समतेचा संदेश देणारा धर्म म्हणजे भागवत धर्म. समानता आचारांत आणणारा धर्म म्हणजे भागवतधर्म. समाजाचें ऐक्य सांधणारा धर्म म्हणजे भागवतधर्म आणि या भागवत–धर्माचें आद्य पीठ पंढरी, पंढरपूर. लहान थोर, उच्च नीच, श्रीमंत गरीब हा भेदाभेद निदान इंद्रायणीच्या परिसरांत तरी असत नाहीं. महाराष्ट्रीय मनाला इंद्रायणीचें जन्मजात आकर्षण असतें. मानसशास्त्रज्ञांनीं भावना हा एक स्थायीभाव मानला. याचें कारण मनाला असणारें हें जन्मजात आकर्षण आणि हें आकर्षण जन्मजात असल्यामुळें इथें शिक्षणाचा प्रश्नच उद्भवत नाहीं. शिक्षणाचा संस्कार झालेलें महाराष्ट्रीय मन असो, अगर शिक्षणाला वंचित झालेलें महाराष्ट्रीय मन असो, त्या मनाची आंतरिक ओढ इंद्रायणीकडे असते. इंद्रायणीच्या कांठावर उभा असलेला, एक-दोन नव्हे अठ्ठावीस युगें उभा असलेला पांडुरंग मराठी मनाला सदैव पाचारण करत असतो. आणि मन आपाततः पांडुरंगपदीं विलीन होतें.

संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज म्हणजे तर पंढरीचे महान् संत. पंढरी त्यांचें सारसर्वस्व ! पंढरीचा महिमा गातांना संत श्रेष्ठ म्हणतातः– " पंढरीचा महिमा । देहें आणिक उपमा ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ ऐसा ठाव नाहीं कोठें । देव उभाउभी भेटे आहेति सकळ । तीर्थें काळें देती फळ ॥ २ ॥ तुका म्हणे पेठ । भूमिवरी हे वैकुंठ ॥. ३ ॥" भारतांत अनेक तीर्थक्षेत्रें आहेत. तीं सर्व फळ देणारीं आहेत; पण तें कांहीं काळांतच. पंढरपूर हें असें एक क्षेत्र आहे कीं तें सर्वकाळ फळ देतें. कारण हें भूतलावरचें वैकुंठ आहे.

यंत्रयुगानें मानवी जीवनांत आमूलाग्र क्रांती केली हें खरें. यंत्र हें मानवाला बरदान ठरलें हें पण खरें. पण यंत्रानें मानवी जीवनांतील आनंद कांहीं प्रमाणांत कमी केला हें निःसंशय. आज पीठाच्या गिरण्या खेडोपाडीं झाल्या आहेत. पण कांहीं वर्षांमागें दळण जात्यावरच दळलें जात असे. आणि पहांटेच्या वेळीं जात्यावरच गाण्याचे मंजुळ सूर ऐकूं येत असत. पहांटेची वेळ, कोमल मंजुळ सूर यांनीं वातावरण कसें आल्हाददायक बनत असे. लोक-

गीतांचा उदय अशा प्रसन्न वातावरणांतच होऊं शकतो. लोकगीतांचे विषय साधेसुधे घरगुती असतात. पण आंतरिक जिव्हाळ्यामुळें कसें हृदयस्पर्शी बनतात. त्या मुळेंच लोकगीतांची अक्षर-वाङ्मयांत गणना होते. श्रीतुकाराम महाराजांचा पुढील अभंग हा जात्यावर म्हटल्या जाणाऱ्या गीताचा उत्कृष्ट नमुना आहे.

संतश्रेष्ठ म्हणतात.

'पंढरीये माझें माहेर साजणी । ओवियें कांडणीं गाऊं गीत ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ राही रखुमाई माता । पांडुरंग पिता माहियें ॥ उद्धव अक्रूर व्यास आंबऋषी । भाई नारदासी गौरवीन ॥ २ ॥ गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । त्यांचे कवतुक वाटे मज ॥ ३ ॥ मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ॥ ४ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥ ५ ॥ परसो भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळांसी ॥ ७ ॥ चोखामेळा संत जिवाचे सोइरे । न पडे विसर त्यांचा घडी ॥ ८ ॥ जीवींच्या जीवना एका जनार्दना । पाटका कान्हया मिराबाई ॥ ९ ॥ आणीक ही संत महानुभाव मुनी । सकळां चरणीं जीव माझा ॥ १० ॥ आनंदें ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारकरी ॥ ११ ॥ तुका म्हणे माझा बाळिया मायबाप । हर्षे नांदो सये घराचारी ॥ १२ ॥ वसुधा हेंच संतांचें कुटुंब. श्रीतुकाराम महाराजांच्या कुटुंबांत कोण कोण आहे पहा. पिता पांडुरंग माता सत्यभामा रखुमाई इतर नातेवाईक गरुड अंबरीष, अक्रूर, व्यास, पुंडलीक निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, चांगदेव, रोहिदास, कबीर चोखामेळा मीराबाई आणि महानुभाव मुनी. ही यादी येथेंच संपत नाहीं सर्व भूमि व्यापते. 'खऱ्या अर्थानें' वसुधैव कुटुंबकम्।

ज्यांना पंढरपुराचा वास घडतो ते धन्य होत । पंढरीचा वास धन्य ते प्राणी । अमृताची वाणी दिव्य देह ॥ १ ॥॥ ध्रु० ॥ मूढ मतिहीन दुष्ट अविचार। ते होती पंढरी दयारूप ॥ ध्रु० ॥ शांति क्षमा अंगीं विरक्ती सकळ । राइय निर्मळ नारी नर ॥ २ ॥ तुका म्हणे वर्णी अभिमान । अवघे जीवन्मुक्त लोक ॥ ३ ॥

संतश्रेष्ठ म्हणतात.

इंद्रायणीच्या पाण्याचा गुणच असा आहे कीं त्याच्या प्राशनानें मनोविकार ताब्यांत येतात. दुष्ट प्रवृत्ति नष्ट होऊन सुसत् प्रवृत्ति गतिमान् होतात,

जीवनांत आमूलाग्र बदल होतो. अर्थात हें सर्व पांडुरंगावर निष्ठा असणाऱ्यांच्या बाबतींत घडतें असा याचा अर्थ आहे. गीतेंत भगवान् श्रीकृष्णांनीं म्हटलें आहे. माम् अनुस्मर युध्य च । पण लगेच भगवान् मा फलेषु कदाचन । लढाई कर पण फलाशेनें नव्हे ।

218

श्रीतुकाराम महाराज पुढील अभंगांत म्हणतात.– "पंढरपुरींचें दैवत भजावें । काया वाचा जावें शरण त्या ॥१॥ मनीं ध्यान करी अहंता धरूनी । तया चक्रपाणी दूर ठेला । मान अभिमान सांडूनियां द्यावे । अवघ्यांनींच व्हावें तरी प्राप्त ॥ २ ॥ तुका म्हणे हेंचि कोणासी सांगावें । सादर होउनि भावें भजें देवा ॥३॥"

पांडुरंग आपलासा करून घ्यावयाचा असेल तर त्याला अनन्य-भावें शरण गेलें पाहिजे. मनामध्यें अहंकार ठेवून ध्यान केलें तर तो दूरच राहील अभिमान सर्वस्वीं सोडून दिलात हलक्यांतील हलकें काम संतोषानें केलेंत तर तो तुमचा सन्निध आलाच. पंढरीच्या पांडुरंगाला प्राप्त करून घ्यावयाचा हाच मार्ग आहे.

पंढरीला जाण्यासाठीं संतश्रेष्ठ किती अधीर होत असत. मला आतां धीर धरवत नाहीं. मला पांडुरंगाला भेटवाच ।

पंढरीची वाट पाहें निरंतर । निढळावरी कर ठेवूनियां ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ जातियां निरोप पाठवीं माहेरा। कां मज सासुरा सांडियेलें पैल । कोण दीसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिखें चतुर्भुज ॥ २ ॥ तुका म्हणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटशी केधवां पांडुरंगा ॥ ३ ॥

ते पहा गरुडावर स्वार होऊन भगवान विष्णु मोठ्या त्वरेनें येत आहेत. अहो, मीही त्यांना भेटण्यासाठीं अगदीं अधीर झालों आहें. हे चतुर्भुज पांडुरंग मला तुझ्या पायाला घट्ट मिठी मारूंदे । कधींही न सुटणारी अनंत काळ घट्ट राहणारी मिठी मारूंदे.

"पंढरीची वारी आहे माझ्या घरीं । आणिक न करीन तीर्थव्रत ॥ १ ॥ व्रत एकादशी करीन उपवासी । गाईन अहर्निशीं मुखीं नाम ॥ २ ॥ नाम विठोबाचें घेईन मी वाचे । बीज कल्पांतींचे तुका म्हणे ॥ ३ ॥ पंढरीशिवाय मला अन्य तीर्थक्षेत्र नको. कल्पांतापर्यंत मी विठोबाच्या नांवाचा जप करीत राहीन। विठ्ठल, विठ्ठल, जय जय विठ्ठल.

श्रीतुकाराम महाराजांचा पुढील अभंग वाचला कीं मन एका विचारानें खिन्न होतें. गुणांप्रमाणें जातीची कल्पना मान्य करतां येण्यासारखी आहे. पण जन्मावरून जेव्हां जाति ठरविली जाते तेव्हां दुर्धर प्रसंग ओढवतो. "मी जातीचा हीन आहें, मला भजन कसें करावें हें कळत नाहीं" असें म्हणण्याची पाळी जेव्हां संतश्रेष्ठावर येते तेव्हां अंतःकरण बिदीर्ण होतें. "पंढरीची वारी जयांचिये घरीं। पायधुळी शिरीं वंदीन त्यांची ॥ १ ॥ दासाचा मी दास पोसणां डोंगर । आतां बहु फार काय बोलों । जातीचें मी हीन नकळे भजन। म्हणोनि संतचरण इच्छीतसें ॥ २ ॥ तुका म्हणे मज म्हणावें आपुलें । बहुतां तारिलें संत जनीं॥ ३ ॥" जातिभेदाचें विष नष्ट होण्यासाठीं नीळकंठ कोण होणार ?

पंढरीचा पांडुरंग हा नीळकंठ आहे. भागवतधर्माचा प्रसार करण्यासाठीं पंढरीची वारी अत्यंत आवश्यक आहे. "भक्तांनों या, या, हा पहा मी तुमच्यासाठीं अनंत काल विटेवर उभा आहें. पण मला पुंडलीकासारखें सेवेचें व्रत घेणारे भक्त हवेत. विराट् स्वरूपांतील माता-पित्यांची सेवा हाच मला वश करून घेण्याचा मार्ग आहे." संतश्रेष्ठाच्या पंढरीचा हा संदेश आहे. सर्व धर्मी समानता !

**************

पत्रव्यवहार—

# श्री साईबाबा फाउंडेशन

भक्तवत्सल श्रीसाईबाबा यांचा येता पुण्यातिथ्युत्सव सुवर्णमहोत्सव या नात्यानें शिरडी व मुंबई येथें मोठ्या थाटांत साजरा करण्यांत येणार असून त्याबाबतींत पूर्वतयारी सध्यां जोमानें चालू आहे. त्या महोत्सवासंबंधीं किंवा साईबाबा फौंडेशनसंबंधी बाबांच्या कोणा भक्तास स्वतःचे विचार प्रकट करावयाचे असल्यास ते पत्रव्यवहार या सदरांत प्रसिद्ध केले जातील. मात्र ते विचार आटोपशीर व कागदाच्या एकाच बाजूवर लिहिलेले असावे. ( पाटपोठ ) कृपा करून लिहूं नये ही विनंती.

— संपादक

सप्रेम नमस्कार वि. वि.

श्रीसाईलीला मासिकाच्या जुलैच्या अंकांत 'श्रीसाईबाबाफाउंडेशन' या बद्दल जें निवेदन आलें आहे तें वाचून जे विचार सुचले ते सर्वांच्या विचारासाठीं पुढें मांडीत आहे. योग्य वाटल्यास पुढील अंकीं प्रसिद्धी द्यावी.

ज्या ज्या क्षेत्रांत या फाउंडेशनमधून मदत देण्याचा अगर पैशांचा विनियोग करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे, त्यांतील कुठलेंही क्षेत्र अयोग्य आहे असें मुळींच नाहीं. पण प्रश्न असा कीं या सर्व क्षेत्रांत प्रामाणिकपणें कार्य करणारीं माणसें व त्यासाठीं लागणारा अमाप पैसा कोठून उभा करावा ? त्यामुळें कदाचित् परिस्थिती अशी होईल कीं, 'एक ना धड नि भाराभर चिंध्या.' त्यापेक्षां विद्यादान व औषधोपचार या दोनच गोष्टींवर लक्ष केंद्रित करून या फाउंडेशनचा उपयोग व्हावा. कारण बाकीच्या पुष्कळ क्षेत्रांत सरकारी पातळीवर कार्य चालूच आहे. पण प्रयत्न अपुरे पडत आहेत. नागरिकांनीं सर्वच गोष्टींत सर्वस्वी सरकारवर अवलंबून राहणें केव्हांही अयोग्य. सर्व नागरिकांनीं एकादा प्रश्न संघटितपणें सोडविण्याचें ठरवलें तर त्याचा फायदा सर्वांनाच होतो.

दुसरी गोष्ट मनाला चाटून जाते ती अशी कीं—या फाउंडेशनचे सर्वच पदाधिकारी इतके उच्चपदस्थ आहेत कीं त्यांना या सर्व कार्यांवर सर्वकाळ लक्ष केंद्रित करण्या इतका वेळ अगर सवड मिळेल का ?

कुठलें ही कार्य अगर संस्था अतिविस्तृत होत गेली कीं त्याचा विचका होतो. हा अनुभव आहे. तसें होऊं नये म्हणून हे विचार मांडले आहेत. उत्साहाच्या भरांत आपण कांहींही संकल्प करून बसतों; पण तो समाधानकारकपणें तडीस नेणें हें फार खडतर कार्य असतें. 'तथापि हित आणि मित बोलेल । बोला ऐसेंच जो वागेल । खरे करूनि दाविल निजबोल । असा एखादाच हरीचा लाल । श्रीसाईसच्चरित अध्याय २३ । २२४ ।

श्रीसमर्थ साईबाबांनीं त्यांच्या हयातींत इतकें प्रचंड कार्य केलें कीं आपण कितीही संस्था काढल्या तरी त्या तेवढें कार्य करूं शकणार नाहींत. याचा अर्थ असा नव्हे कीं आपण कांहींच करूं नये. फक्त कोणतेंही नवीन कार्य सुरू करतांना आपल्या मर्यादित शक्तीची आठवण ठेवावी. जाहिरात म्हणजे कृती नव्हे.

श्रीसाई बाबांच्या कृपेनें या कार्याला सर्वांचे हात लागोत व तें यशस्वी होवो अशी बाबांच्या चरणीं प्रार्थना करून हें पत्र संपवितों.

आपला नम्र

**गं. रा. भट**

# शिरडी-वृत्त

**-जून १९६८-**

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्त नेहमींप्रमाणें आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालील प्रमाणें :-

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. नरहरबुवा व्यास, मु. तळेगांव ( दाभाडे ) पुणें.
श्री. ह. भ. प. जेऊरकर महाराज मु. जेऊर ( बायजावई ) जि. नगर
श्री. विठ्ठलराव मराठे यांचीं कीर्तनें नेहमींप्रमाणें झालीं.

**बुलबुल तरंग**

श्री. महादेव सीताराम कुरतरकर माठेवाडा मु. सावंतवाडी. जि. रत्नागिरी.

**भजन**

श्री. सौ. सीतालक्ष्मी सुंदरम् ४६ रास्तापेठ, पुणें ११

**कसरतीचे प्रयोग**

श्री. विठ्ठल मारुती लाखे मु. वांई. जि. सातारा.

**न्या. मू. मुधोळकर**

न्यायमूर्ती मुधोळकरसाहेब, न्यू दिल्ली व
मे. दलालसाहेब. मुंबई उभयतांनीं साईसमाधीपूजा व सत्यनारायणपूजा केली.

**हवा पाणी.**

शिरडी येथील हवापाणी ठीक आहे पावसाळा सुरू झाला असून ढगाळ आकाश, हवा कुंद, रोगराई कांहीं नाहीं.

# श्रीसाईनाथ अष्टपदी

## प्रार्थना (कामदा)

ॐ- काररूपा हे सगुण सुंदरा ॥
न-मुं प्रथम ह्या शारदावरा ॥
मो-रेश्वरा बुद्धिसागरा ॥
सा-ईभक्तिची गोडि दे मला ॥
ई-श असिस तूं अष्टगणांचा ॥
ना-ममंत्र हा सत्य त्रिवाचा ॥
था-रा नसे दुष्ट मानवा ॥
य-श देसी तूं ज्ञानिया जनां ॥

## पद २ रें

चाल :–लावणीची

साई हो साई बाबा साई; नाथ नाम तुला शोभते ॥
अशा योग्याचे दर्शन घडतां मुक्ति तयाला लाभते ॥
तुम्ही माझी माता, पिता, दाता माता, नातें बरोबर शोभते
अशा योग्याचे दर्शन घडतां ॥ १ ॥
तुम्हांवरि भार निष्ठा निर्धार मानव जिवन हें कंठितो ॥
श्रद्धा सबुरी मनीं वसुंदे मानव दास तंव विनवितो ॥ २ ॥

## पद ३ रें

( चाल :–म्हणसी दूर जाऊं आई )

जे म्हणसी माझें माझें मानवा नाहीं तुझे तें ॥ धृ० ॥
इहलोकिंचा पसारा, भासमान आहे सारा ॥
पुत्र मित्रजन आणि दारा वैभवांत ते ॥ १ ॥ जे०
जन्मा आधीं मातृदेहीं निर्मी दुग्ध श्रीहरी साई
सर्व चिंता तुझी वाही खरें तुझे ते ॥ २ ॥ जे०
मानवदासा प्रचिती आली निर्वाणीचा नाथसाई
कुणि कुणाचे नाहीं नाहीं संत वचन तें ॥ ३ ॥ जे०

## पद ४ थें

( चाल :–दोन प्रहर रात्र झाली )

दिनांचा देव राणा शिर्डीमाजीं प्रगटला ॥
धान्य घंटी धुणी संगें परिवार मांडिला ॥
सबुरी निष्ठा मंत्र देई भक्तासी सर्वदा ॥
मानव दासा ठाव देई दूर लोटी ना कदां ॥ १ ॥

## पद ५ वें

( चाल :–प्रिय बंधु भेटला )

मना ध्यास लागला दर्शना योग घडविला ॥
शके १८३५ सांत श्रावणमासीं ग्रहणांत मातेचा
दीप विझाला ॥ १ ॥ मना०
अंतकाळचे तिचे बोल आतां आई तुझी बाबा बाळ
दर्शना जाई एकदां ॥ २ ॥ मना०
दर्शनांतीं सूचित केलें तें आतां कळुं आलें वंशाचा
वृक्ष फुलविला ॥ ३ ॥ मना०
मानवदासा सदा ध्यास लागो तुझा माझी हीच
प्रार्थना ॥ ४ ॥ मना०

## पद ६ वें

( चाल :–राधाकृष्ण बोल )

नाम तुझें गोड बाबा नाम तुझें गोड
भवसागरीं पडलों नाथा आस पाश तोड ॥ देवा नाम
संसारीं ह्या न सुचे कांहीं पुरवी माझें कोड ॥ देवा
मानवदास हा विनवी चरणीं शेवट करिंगा गोड ॥ देवा

## पद ७ वें

नको अंत पाहूं बाबा धांवा झडकरी ॥
बहुत क्षीण झाला नाथा तापत्रय हरी ॥
नाहीं केला दानधर्म नाहीं झालें पुण्यकर्म ॥
पदोपदीं अपमानानें गेलें जीवन ॥

जरा आधी व्याधीनें वेष्टियेलें अंग
छळती मज वैरी खरे षड्रिपु हे भांग ॥
मानवदास येतो शरण भिक्षा घालीं " वरदान "
अपराधाची क्षमा करून मज उद्धरीं ॥ नको अंत० ॥

## पद ८ वें

( चाल :–चंद्रकांत राजाची कन्या )

श्रीसाई चरित्रा सात दिसांचा सप्ताह सुरू केला
सच्चिदानंदीं अलभ्य योग हा आम्हांतें घडला ॥ धृ० ॥

अतर्क्य लीला चरित्रीं वाचतां अष्टभाव कंठी
दाटुनि येतो प्रेमाचे ते लोट हृदयान्तीं ॥ १ ॥

पंचमहाभूतें खेळविलीं त्या शिर्डी क्षेत्रांत ॥
पाण्यामध्यें दिवे लाविले द्वारकामाईत ॥
भेद न उरला हिंदू यवना तुझ्या अमदानींत ॥
नास्तिकासी भक्त बनविलें केलेंसी कृतकृत्य ॥ २ ॥

श्रीनाथपंथी प्रगट झाले नऊ जे अवतार ॥
लोकोद्धारां शिर्डी घेतला दत्तावतार ॥
शके १८३५ सालीं माघमासांत ॥
जानकीसुता दर्शन घडलें शिर्डीक्षेत्रांत ॥
कूर्म दृष्टिसम मला न्याहाळिलें अल्प निमिषांत ॥
अन्योक्तीनें मला पाजिले बोधाचें अमृत ॥
तुजविण माता नाहीं कोणी साईजगत् पाळा ॥
तंव हृदयमंदिरीं ठाव देई गा मानवदासाला ॥ ३ ॥

श्रीसाईचरणरज गंगाराम बजावा वैद्य.
डहाणूनगरवासी.

—कोणतीही परिस्थिती वाट्यास येवो. सुखानें ललचावून जायचें नाहीं किंवा दुःखाचा काळ वाट्यास आला असतां भयग्रस्त व्हायचें नाहीं. आपणास विचारी जीवन जगायचें आहे. विचारानें वागायचें आहे. सावधानतेनें प्रत्येक पाऊल टाकायचें आहे. सुख काय किंवा दुःख काय, दोन्ही स्थिति कायम टिकणाऱ्या नाहींत, याची आपण खूणगांठ बांधून ठेविली पाहिजे.

# आनंदाची खाण

साई साई नाम तुझें हें वेड मनाला लावितसे ।
नाम तुझें हें येतां कानीं काहिंएक मज सुचत नसे ॥ १ ॥
नित्य कर्म मी करीत असतां भोग जिवाचा भोगितसे ।
त्यांतुनि मन हें घेऊन उसळी तुझ्या दिशेनें धांवतसे ॥ २ ॥
दांभिकता ही पाहुनि जगतीं कधीं कधीं मन त्रासतसे ।
आश्रय मिळतां तव प्रेमाचा सुखावुनी मग नाचतसे ॥ ३ ॥
उणें दुणें मज कुणी बोलतां राग अनावर होत असे ।
तुझेंच चिंतन करितां करितां दाह तयाचा शमवितसे ॥ ४ ॥
वादावादिस ऊत येउनी दुफळी जगिं या माजतसे ।
बाधा परि ती होऊं न देतां मन हें नामीं रंगतसे ॥ ५ ॥
नानाविध दुःखांनीं भरल्या संसारीं ह्या सौख्य नसे ।
आनंदाची खाण असा तूं एकुलता मज एक असे ॥ ६ ॥
दुःखचि घेउनि रूप सुखाचें जनांस इथल्या भुलवितसे ।
छंद मनाला तुझाचि म्हणुनी मजपासुनि तें दूर वसे ॥ ७ ॥
तुझ्या कृपेचें छत्र शिरावरि रात्रंदिन मज रक्षितसे ।
अशीच ठेऊनि कृपा दयाळा अंतीं करुनी घे आपुलेसें ॥ ८ ॥

—श्याम जुवळे

---

## सतत कर्तव्य पालन करीत रहा

आपल्या परिस्थितीनुसार व योग्यतेनुसार आपल्या वाट्यास जें कार्य आलें असेल तें कोणत्याही प्रकारची आसक्ति न बाळगतां यथासांग पार पडण्यासाठी झटावयाचें. कारण वाट्यास आलेलें कर्म करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. काहीं न करतां स्वस्थ बसण्यापेक्षां कर्म करीत रहाणें हें फार महत्त्वाचें आहे. कोणत्याही प्रकारची आसक्ति न बाळगतां केवळ कर्तव्यबुद्धीनें जो कोणतेंही काम करतो तो भगवंताला कधींना कधीं आपल्याजवळ आणूं शकतो.

# श्री साईनाथ हॉस्पिटल

## देणग्यांची साभार पोंच

[ मागील अंकावरून ]

| | भक्तांचीं नांवें | गांव | रुपये | पै. |
|---|---|---|---|---|
| ५४ | बी. एस. भंडारे | सातारा | ११ | – |
| ५५ | एम. एन. चंदजानी | सि. बाद | ५१ | – |
| ५६ | सौ. सीताबाई राजाराम वझे | मुम्बई | २५ | – |
| ५७ | सौ. शालिनी कुमार सावंत | ,, | ५ | – |
| ५८ | श्री. ठाकुरदेव टोपनदास | मुम्बई | १०१ | – |
| ५९ | श्री. जसवंतलाल कंकीया | ,, | १०१ | – |
| ६० | श्रीमती सुमती पी. दलाल | ,, | १०१ | – |
| ६१ | श्री. इ. व्ही. नारायन | सिमला | १०० | – |
| ६२ | सुमित्रा अेम्. वकील | मुंबई | ५ | – |
| ६३ | एन्. खांडवाला | ,, | ५१ | – |
| ६४ | उद्धवभाई पटेल | | ३३८ | – |
| ६५ | श्री. एस्. पी. पटेल | मुंबई | १०१ | – |
| ६६ | माधव भट्ट | ,, | १० | – |
| ६७ | मधुसूदन भट्ट | ,, | १० | – |
| ६८ | कंधार फ्रूट कंपनी | दिल्ली | २५० | – |
| ६९ | डॉ. एन्. जी. देसाई | भुज–कच्छ | १००० | – |
| ७० | श्री. बी. एन्. अडाप्पा | मुंबई | २०० | – |
| ७१ | मिसेस शैला. व्ही. समेळ | ,, | ११ | – |
| ७२ | कु. हेमलता पिंगे | ,, | २५ | – |

| | भक्तांचीं नांवें | गांव | रुपये | पै. |
|---|---|---|---|---|
| ७३ | निकशा भट्ट | मुंबई | ११ | – |
| ७४ | रणछोड पटेल | बडोदा | २२५ | – |
| ७५ | एस्. जे. भल्या | मुंबई | ५१ | – |
| ७६ | श्री. किसन हजारीमल पटवारी | धुळें | ५० | – |
| ७७ | दीपक मेहता | मुंबई | ५० | – |
| ७८ | टी. एम्. शहाणी | ” | ५१ | – |
| ७९ | के. एस्. सुंदरम् | ” | ५१ | – |
| ८० | पी. आर. राजामणी | कल्याण | ११ | – |
| ८१ | श्री. डी. व्ही. शहा | मुंबई | ३०१ | – |
| ८२ | मिस् एल्. आर. मेहता | ” | १० | – |
| ८३ | लेट रतन. पी. पटेल | ” | १०० | – |
| ८४ | लेट दोसाभाई तंगरी | ” | १०० | – |
| ८५ | श्री. वि. रा. भट | वसई | १० | – |
| ८६ | मधु भट | मुंबई | २५ | – |
| ८७ | माधव भट | ” | १० | – |
| ८८ | जी. आर. भट | ” | ५१ | – |
| ८९ | के. एम्. दारूवाला | ” | ७ | – |
| ९० | ॲ. के. ए. दवे | जि. अमरोली | ५१ | – |
| ९१ | के. एस्. बुछीआ | अलाहाबाद | ७०० | – |
| ९२ | कु. कल्पना म. बावरे | मुंबई | १७० | – |
| ९३ | के. जी. नरीमन | मुंबई | १०० | – |
| ९४ | इंद्रसिंग | ” | ११ | – |
| ९५ | ए. व्ही. सुशीलाबाई | येल्लूर | १००० | – |
| ९६ | श्री. एस्. पी. वधवा | घाटकोपर | ५१ | – |
| ९७ | शामसुंदर मिड्डा | अंबाला | २२ | – |

| | भक्तांची नांवें | गांव | रुपये | पै. |
|---|---|---|---|---|
| ९८ | सुधीर के. पोतनीस | मुंबई | ५ | — |
| ९९ | श्री. अर्जुनदास | ,, | ५ | २५ |
| १०० | कृष्णदास | ,, | ५ | २५ |
| १०१ | भगतसिंग सेवक | हुबळी | १५३ | — |
| १०२ | एस्. जे. मल्ला | मुंबई | ११ | — |
| १०३ | स. गो. जांभेकर | अहमदाबाद | ११ | — |
| १०४ | डॉ. सौ. सरोज भट्ट | मुंबई | ११ | — |
| १०५ | डॉ. सौ. रंजन भट्ट | ,, | ११ | — |
| १०६ | श्री. व्ही. बी. दलाल | ,, | ५ | — |
| १०७ | ,, एम्. एम्. देसाई | नडियाद | १०१ | — |
| १०८ | सुमित्रा आर | मुंबई | २५ | — |
| १०९ | टी. आर. पंडीत | ,, | १००१ | — |
| ११० | श्री. एस्. ए. त्रिवेदी | ,, | ११ | — |
| १११ | ,, एन्. सी. भुजवाला | ,, | ६१ | — |
| ११२ | दोधा भाऊसिंग राजपूत | नवेगाव | ८५१ | — |
| ११३ | श्री. एस्. पी. मिस्त्री | मुंबई | ११ | — |
| ११४ | ,, जी. सी. नायडू | हैद्राबाद | १००० | — |
| ११५ | कपूरचंद अँड कंपनी | मुंबई | ५० | — |
| ११६ | सेवक ट्रान्स्पोर्ट कंपनी | हुबळी | १०१ | — |
| ११७ | श्री. का. वि. कामत | मुंबई | ५१ | — |
| ११८ | एम्. नेमीचंद जानी | सि. बाद | ४१ | — |
| ११९ | रमेश टी. मुन्सी | मुंबई | १२ | ५० |
| १२० | सी. आर. देसाई | ,, | १५ | — |
| १२१ | सौ. शकुंतलादेवी मालीनाथ | बेंगलोर | १०१ | — |
| १२२ | विजयकुमार मालीनाथ | ,, | १०१ | — |

| | | | |
|---|---|---|---|
| १२३ | माधव भट | मुम्बई | १० – |
| १२४ | श्री. मधुसूदन भट | ” | १० – |
| १२५ | वी. जी. के. राव | ” | १५० – |
| १२६ | श्री. एम. डी. मालीपाटील | | ३८७ – |
| १२७ | कु. प्रभावती माली पाटील | ” | २० – |
| १२८ | श्री जे. एन. मेहता | मुम्बई | ११ – |
| १२९ | मे. जे. जे. आणि कंपनी | अहमदाबाद | १०१ – |
| १३० | एन. वल्लभराम | बेंगलोर | १०० – |
| १३१ | श्रीमती सोनाबाई राजोपाध्ये | मद्रास | १५ – |
| १३२ | डॉ. रंजन भट | मुम्बई | १० – |
| १३३ | डॉ. विनू भट | ” | ५ – |
| १३४ | सौ. डी. एन. दस्तुर | सि. बाद | १५ – |

## दर्शन

शतजन्म संपले आतां उरलें काहीं
स्वप्नांत पाहिले आज अचानक साईं ॥ धृ० ॥

अंगावर खुलली सुंदर भगवी छाटी ।
वक्षावर फुलली हार फुलांची दाटी ॥ १ ॥

नवलाख असावे दीप उजळले भासे ।
नवजात सुमांचा सुगंध दरवळलासे ॥ २ ॥

तें सुस्वर गायन असेल भक्त जनांचें ।
कीं, आशीर्वच असतील साईनाथांचे ॥ ३ ॥

मी उभीच होतें दिग्मूढाच्या स्थितींत ।
तो पहांटवारा हळू येई सुखवीत ॥ ४ ॥

कवि, साईभक्त

Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित
व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality–by Pradhan | | | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality (Telgu) | | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा–अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणु | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. सीप्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. सीप्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१५) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१६) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१७) | Guide to Shirdi (English) | | | ००-१२ |
| (१८) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

व्ही. पी. ची पद्धत नाहीं.

Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ | medium | 00-37 |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}'' \times 13\frac{1}{2}''$ | medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. Executive officer Shri Sai Baba Sanstan,
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. Sai Baba Office 'Sai Niketan,'
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मुद्रक: पांडुरंग दाजीबा मोरे निर्णयसागर प्रेस, २६।२८ डॉ. एम. वी. वेलकर स्ट्रीट, मुंब
संपादक व प्रकाशक: द. दि. पाटणकर, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, दादर, मुंबई १४